बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com
बेरार टाईम्स
मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे

गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१२ गोंदिया | अंक २५ | बुधवार,दि. ३१ मे २०२३ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024

नक्षल्यांच्या भ्रमणमार्गावर सशस्त्र दुरक्षेत्र पोलीस चौकी

गोंदिया:- गेल्या तीन चार दशकापासून नक्षल्यांच्या हालचालीमुळे जिल्ह्याला नक्षलवादाचा फटका सहन करावा लागत आहे. त्यामुळे आदिवासी नक्षलग्रस्त भागातील जनतेशी संवाद साधत सुरक्षेची भावना निर्माण करण्यासाठी पोलीस विभागाच्यावतीने सशस्त्र दूरक्षेत्र पोलीस चौक्या (एओपी) उभारल्या जात आहेत. गोंदिया जिल्ह्यातील नक्षलग्रस्त भागात आत्तापर्यंत १० आर्म्ड आऊट पोस्ट उभारण्यात आल्या असून ११ वी आऊट ही गडचिरोली जिल्ह्याच्या सीमेवर पिपरखारी येथे उभारण्यास सुरवात झाली आहे.

विशेष म्हणजे शेजारील गडचिरोली जिल्ह्यातील कोरची तालुक्यातील म्हसेली, आ-गरी परिसरात जो लोहप्रकल्प उभारला जाणार आहे. त्या प्रकल्पाच्या सुरक्षेच्या दृष्टीने सुध्दा ही एओपी महत्वाची ठरणार आहे. सध्या जल जंगल जमीनच्या नावावर त्या लोहखनिज प्रकल्पाला विरोध होत असला तरी प्रकल्प सुरु झाल्यानंतर जिल्हा सिमेवर पिपरखारी एओपी सुरक्षेकरीता महत्वाची भूमिका बजावणार असल्यानेच या ठिकाणी ही एओपी तयार करण्यामागचा पोलीस प्रशासनाचा उद्देश आहे.अ

नक्षलग्रस्त भाग असलेला पिपरखारीचा जंगलपरिसर जो ढास पहाडाला लागून आहे, त्याभागातून नक्षल्यांची गडचिरोली जिल्ह्यातून गोंदिया जिल्ह्यात एंट्री व्हायची. त्या भागातच पोलिसांनी आऊट पोस्ट उभारण्यास सुरवात केले आहे.

२०२० मध्येच मंजुरी मिळालेल्या या पोलीस चौकीच्या कामाला ३० जानेवारी २०२३ रोजी सुरवात करण्यात आली. खासगी जमीन संपादित करुन सी ६०, बीएसफ, आयआरबी व पोलीस उपमुख्यालयाच्या जवांनानी एकत्र येत १६ हजार सिमेंट बँग तयार करुन या पोलीस चौकीच्या बांधकामाकरीता सुरक्षा भिंत तयार केली होती. ३ एकर जागेवर ही सशस्त्र दूरक्षेत्राचे काम होत असून १९९०-९१च्या काळात नक्षल्यांच्या कारवायाचे शिकार झालेल्या इसमाने ही जागा उपलब्ध करुन दिली आहे.

पिपरखारी गटग्रामपंचायत असलेले गाव हे बीचटोला, इंदिरानगर, मडावीटोला, पुरामटोला व गौराटाला असे मिळून तयार झाले आहे. येथील बीचटोला येथे ही सशस्त्र चौकी उभारण्यास सुरवात झाली आहे. १९० घरांची वस्ती असलेल्या या गावची लोकसंख्या २१५० च्या जवळपास आहे. पिपरखारी पोलीस चौकीपासून गडचिरोली जिल्ह्याची सीमा हा १० किमी असून कोरची पोलीस चौकी १६ किमीवर आहे.

असा आहे जंगल परिसर

पुर्व भागाला-तवागड,एडमागोंदिचे जंगल
पश्चिम भागाला-मलकाझरी, प्राणपूरचे जंगल
दक्षिण भागाला-पडियालजोब,मुरकुटी जंगलपरिसर
उत्तरभागाला-ढासगड जंगलपरिसर

नक्षल्यांचा भ्रमणमार्ग

कोरची भागातून नागनडोह, मयालगट, ढासगड, रेहांडीफोटा, चिपोटा, मेहताखेडा, हलदीफुटाना, जोब, सिरपूरडँम, इळुकचुवा, शिवमंदिरपहाडी, गल्लाटोला मार्गे बोरतलाव या मार्गाने कान्हाकडे जाण्याचा नक्षल्यांचा मार्ग आहे. या पोलीस चौकीमुळे या मार्गावर आता नक्षल्यांना आळा बसणार आहे.

जिल्ह्यातील सशस्त्र पोलीस चौकी

बोंडे, मगरडोह, पिपरखारी, गणूटोला, बिजेपार, दरेकसा, मुरकुटडोह, पिपरीया,धाबेपवनी, गोठणगाव व केशोरी

नक्षल भरतीमध्ये गोंदिया जिल्ह्यातील युवकांचा समावेश नाही-अप्पर पोलीस अधिक्षक अशोक बनकर

नक्षल्यांची चळवळ दिवसेंदिवस खिळखिळी होत चालली असून गेल्या काही वर्षाचा विचार केल्यास गोंदिया जिल्ह्यातील आदिवासी युवक हा पोलीस व प्रशासनासोबत एकत्र येत स्वयंरोजगारासह नोकरीकडे वळल्याने नक्षलभरतीमध्ये गेलेला नाही. मात्र नक्षल्यामध्ये सध्या छत्तीसगडमधील बस्तर भागातील व गडचिरोली जिल्ह्यातील काही युवकांचा समावेश होत आहे. आधी या गावाकडे पोलीस फिरायचे तेव्हा गावकरी दूरुनच दार बंद करायचे मात्र जेव्हापासून दादालोरा खिडकी योजनेच्या माध्यमातून यांची कामे करुन दिली जाऊ लागले तेव्हापासून आता मिळून मिसळून राहत असून सध्या याठिकाणी नवनिर्मित बांधकाम सुरु असतानाच काही सणत्योहार आले तर एकमेकासोबंत मिठाई वाटप करुन स्नेहबंध जोपासले जात असल्याचे सांगितले.

१०० ते १५० सुबेअंनाच कंत्राटाची खैरात

दरवर्षी कोट्यावधीची कामे करणाऱ्या सुबेअवर कार्य.अभियंत्याची मेहरबानी

गोंदिया- जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाकडे नोंदणी असलेल्या परंतु बांधकाम विभागासह लघु सिंचन व पाणी पुरवठा विभागातंर्गतचे कामे करणाऱ्या सुशिक्षित बेरोजगार अभियंत्याला १० वर्षात १०० लक्ष रुययाचे कामे देण्याचे शासन धोरण आहे.या १० वर्षात त्यांना जर १०० लक्ष रुपयाची कामे न मिळाल्यास पुर्ननोंदणी करुन तेवढ्या रक्कमेची कामे करण्याकरीता संधीही देण्यात आली आहे.मात्र कोट्य़वधीची कामे १० वर्षात नव्हे तर एकाच आर्थिक वर्षात पुर्ण करणारे २०-२५ सुशिक्षित बेरोजगार अभियंते हे गेल्या काही वर्षापासून अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,कार्यकारी अभियंता व टेंडर क्लर्कच्या संगनमताने अन्य सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांवर अन्याय करीत असल्याचे चित्र उघडकीस आले आहे.जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाकडे नोंदणी असलेल्या ६२४ सुशिक्षित बेरोजगार अभियंत्याची नोंदणी आहे.यापैकी आजही ५० टक्केहून अधिक सुबेअना काम वाटप समितीच्यावतीने कामच दिले गेले नसल्याचे सन २०२१-२२ व २०२२-२३ च्या कामवाटपाच्या यादीवरुन बघावयास मिळत आहे.जवळपास काम वाटप यादीचे निरिक्षण केल्यास १००- १५० सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यानाच वारंवार दरवर्षी कामे दिली जात असल्याने इतर बेरोजगार अभियंत्याना मात्र पायपटी करण्याची वेळ आली आहे.विशेष म्हणजे बांधकाम विभागातील बहुतांश कर्मचारी हे कंत्राटदार बनले असून आपल्या नातेवाईक व जवळच्या मित्राला कसे काम मिळेल याचेच नियोजन करीत असल्याचे दिसून आले आहे.

विशेष म्हणजे एका आर्थिक वर्षात सुशिक्षित बेरोजगार अभियंत्याला काम देतांना १० वर्षात १०० लाख रुपयाच्यावर काम देता येत नसल्याचे बांधकाम विभागाचे धोरण आहे. असे असतांना गोंदिया जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाकडे नोंदणी असलेल्या सुमारे २२ ते २५ सुशिक्षित बेरोजगार अभियंत्याना १ कोटीच्यावर रक्कमेची कामे वाटप करण्यात आल्याची माहिती उघड झाली आहे.या २५ सुशिक्षित बेरोजगार अभियंत्याने लागोपाठ २०२१-२२ व २०२२-२३ या आर्थिक वर्षात कोट्यावधीची कामे केली तर काही सुबेअना १ ते ३ लाख रुपयाच्या कामावरच समाधान मानावे लागले आहे.कोट्यवधीची कामे गेल्या दोन तीन आर्थिक वर्षात सातत्याने करीत असलेल्या सुबेअंना टेंडर क्लर्क व कार्यकारी अभियंत्याचे तसेच काही जिल्हा परिषदेच्या पदाधिकारी व आमदारांचे पाठबळ असल्याचे स्पष्ट होत आहे. विशेष म्हणजे काही सुशिक्षित बेरोजगार अभियंते हे खासगी फर्म तयार करुन काम करीत आहेत.तर काही खासगी नोकरी करुनही काम करीत आहेत.मात्र नोकरी करीत असल्याचे प्रतिज्ञापत्र दिल्याचे विभागाने तपासलेले दिसून येत नाही.नोंदणी नंतर १० वर्षाची मुदत संपल्यानंतर सुबेअला स्वतंत्र कंत्राटदार म्हणून नोंदणी करावयाची असताना गोंदिया जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाकडील माहितीनुसार २०-२५ सुबेअ हे कोट्यवधीची कामे करुनही आपले नाव सुबेअच्या यादीतून कमी करुन स्वतंत्र कंत्राटदार म्हणून नोंदणी का करीत नाही अशा प्रश्न उपस्थित झालेला आहे.या राजकारणी सुबेअमुळे गरजू व पात्र सुबेअंना मात्र वर्षाला १ ते ३ लाखाच्या कामावरच समाधान मानण्याची वेळ आली आहे.यातही अधिकारी कमीशनच्या नादात सर्व काही खेळ खेळत असल्याचे दिसून येत असून कार्यकारी अभियंत्याच्या अधिकारावर काही वरिष्ठ अधिकारी आपण मोठे म्हणून हक्क सांगून कार्यकारी अभियंत्याच्या कामात ढवढवळा करीत असल्याचे गेल्या दोन वर्षापासूनही गोंदिया जिल्हा परिषदेतील चित्र बनले आहे.

आहे.या सर्व काम वाटपामध्ये मोठ्याप्रमाणात सावळागोंधळ गेल्या ५-१० वर्षापासून या विभागात सुरु असल्याने अनेक सुबेअंना कामाची निविदा मिळण्यापासून काही निवडक सुबेअमुळे वंचित राहण्याची वेळ आली आहे.

शासन निर्णयात एक किंवा दोन अथवा मोजक्याच निवडक विविक्षित सुशिक्षीत बेरोजगार अभियंत्यांना काम देण्याचे टाळावे. तसेच सर्वसाधारणता: एका सुशिक्षीत बेरोजगार अभियंत्याला त्या संस्थेच्या आर्थिक व इतर मर्यादापेक्षा अधिक काम देण्यात येऊ नये असे स्पष्ट निर्देश असताना गोंदिया जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागात या निर्णयाला हरताळ फासले गेले आहे.

मजूर सहकारी संस्थांना २६ टक्के कामे

ग्रामविकास विभागाच्या ५ एप्रिल २०२३ च्या शासन निर्णयानुसार मजूर सहकारी संस्थांना आता २६ टक्के कामे उपलब्ध करुन दिली जाणार आहेत. तर ३३ टक्के काम असलेल्या सुशिक्षीत बेरोजगार अभियंत्यांच्या कामात ७ टक्क्याने वाढ करुन ४० टक्के करण्यात आली आहे. या नव्या शासन धोरणानुसार काम वाटपाचे प्रमाण २६:४०:३४ असे ठरविण्यात आले आहे. सुशिक्षीत बेरोजगार अभियंत्यांच्या सहकारी संस्थांना १० टक्के कामे. सुबेअ करिता राखीव ४० टक्के कामातून दयावयाचे आहेत. तर विद्युत नोंदणी असलेल्या अभियंत्याला एका काम वाटपात ५ काम देण्याचे ठरविले आहे.

१ कोटीची मर्यादा ओलांडणारे सुबेअ

गेल्या काही वर्षापासून जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागात नोंदणी करुन बांधकाम विभाग, लघुपाटबंधारे व ग्रामीण पाणी पुरवठा विभागाअंतर्गतची विविध कामे करुन सुबेअकरीता वार्षिक ६० लाखाची मर्यादा ओलांडून १ कोटीच्यावरील कामे करणारे सुबेअमुळे इतरांवर अन्याय होत असल्याचे चित्र समोर आले आहे. त्यातच काही सुबेअनी नोंदणी केली असली तरी त्यांना आजपर्यंत एकही काम मिळाले नाही असेही काही आहेत.त्यातच १ कोटीच्यावर काम करणाऱ्यामध्ये गोंदिया जिल्ह्यातील खालील सुशिक्षित बेरोजगार अभियंते म्हणून कंत्राटदारी करीत असलेल्यांचा समावेश आहे. त्यामध्ये विकास मिश्रा १३०.५५ लाख, प्रणव रावत १२० लाख, अजय सेंगर १२५.८५ लाख, प्रतिक मिश्रा १४४.५१ लाख, शुभम साकुरे १६८.७७ लाख, भाग्यश्री बोरकर १४२.४५ लाख, महेश अग्रवाल १६८.८२ लाख, धनेशकुमार कावळे १७९.७८ लाख, देशांक भिवगडे २३०.०३ लाख, शुभम पटले १२४.७९ लाख, अब्दुल रहमान अब्दुल मजीत रिजवान १५६.३१ लाख, अभीजीत कुंजोदवार १८८.९८ लाख, अँप्रेक्स कंट्रक्शन १२०.९१ लाख, करणजीत अजय सेंगर ११४.३० लाख, किर्ती बावणकर २३३.६८ लाख, चेतन नाकाडे २५२.७७ लाख, निक्की येडे ११८.३३ लाख, प्रितेश गौतम २७६.५२ लाख, अरशद कुरैशी १७९.७९ लाख, योगेश नागपुरे २५१.१४ लाख, राहूल चौधरी १३२.०३ लाख, लोकेश भांडारकर १०७.११ लाख रुपयाची कामे एका आर्थिक वर्षात केली आहेत.

पाणी टंचाई कार्यक्रमांतर्गत दुरुस्तीच्या ३१० कामांना प्रशासकीय मान्यता

गोंदिया :- पाणी टंचाई कार्यक्रम टप्पा दोन अंतर्गत सालेकसा व गोरेगाव तालुक्यातील सार्वजनिक विहीरीतील गाळ काढणे, सार्वजनिक विहीरीचे खोलीकरण, इनवेल बोर, नळ योजना विशेष दुरुस्तीच्या ३१० कामांना जिल्हाधिकारी चिन्मय गोतमरे यांनी प्रशासकीय मान्यता दिली आहे. सदर कामांवर ४० लाख रुपये खर्च होणार आहेत. पंचायत समिती गोरेगाव येथील ११६ व सालेकसा येथील १९४ उपाय योजनांच्या कामाचे अंदाजपत्रक शिफारशीसह पाणी टंचाई कार्यक्रम २०२२-२३ टप्पा-२ अंतर्गत सार्वजनिक विहिरीतील गाळ काढणे, सार्वजनिक विहिरीचे खोलीकरण, इनवेल बोर, नळ योजना विशेष दुरुस्तीचे कामांचे अंदाजपत्रक सादर केले होते.

मध्यप्रदेश येथून गांजा पुरवठा करणारा आरोपी गोंदिया पोलिसांच्या ताब्यात

गोंदिया: आमगाव तालुक्यातील पानगाव येथे सालेकसा ते आमगाव रस्त्यावर २५ मे रोजी गांजा घेऊन आलेल्या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अटक केली.

चंद्रभान जियालाल नागपुरे (वय २६ रा.खोलगड, ता.सालेकसा) याच्याकडून ८१५ ग्रॅम वजनाचा गांजा किंमत १७ हजार ९३० रुपये व मोटारसायकल किंमत ५० हजार ताब्यात घेतली. त्यासी सखोल चौकशी केल्यावर तो मध्य प्रदेशच्या बालाघाट जिल्ह्यातील लांजी तालुक्याचा कुंभारीकला येथील आरोपी भुवनलाल केसरीमल कालबेले (वय ५५) याच्याकडून गांजा आणत असल्याचे कळले. पोलिसांनी त्याच्या घरी छापा घालून २ किलो ६६६ ग्रॅम गांजा किंमत ५८ हजार ६५२ रुपयांचा माल जप्त केला. ही कारवाई २८ मे रोजी करण्यात आली.

यासंदर्भात सालेकसा पोलिसांत आरोपीविरुद्ध मादक पदार्थ विरोधी अधिनियमाचे कलम ८(क), २०,२९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता. पहिल्या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेने सालेकसा पोलिसांच्या स्वाधीन केले होते. पोलीस अधीक्षक निखील पिंगळे, अपर पोलीस अधीक्षक अशोक बनकर, उपविभागीय पोलिस अधिकारी विजय भिसे यांनी ठाणेदार सालेकसा यांना गुन्ह्यांच्या अनुषंगाने तपास सुचना केल्या होत्या. गुन्ह्यातील आरोपीकडून गांजाचा पुरवठा करणाा कोण, कुठून गांजा आणला आहे. या संबंधात सखोल चौकशी करुन सुचना दिल्या होत्या. त्यानुसार पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे यांनी गुन्ह्याच्या तपासाच्या अनुषंगाने पुरवठाधारक याचा शोध घेऊन गांजाचा पुरवठा करणारा आरोपी भुवनलाल केसरीमल कालबेले (वय ५५ रा.कुंभारीकला पो.ता.लांजी, जि.बालाघाट (मध्यप्रदेश) याला त्याच्या घरुन ताब्यात घेतले. त्याच्या घरझडतीत २ किलो ६६६ ग्रॅम गांजा किंमत ५८ हजार ६५२ रुपयांचा असा माल जप्त करण्यात आला. या गुन्ह्यात एकुण ३ किलो ४८१ ग्रॅम गांजा किंमत ७६ हजार ५८२ रुपये मोटारसायकल किंमत ५० हजार एकुण १ लाख २६ हजार ५८२ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

छोटी वृत्तपत्रे ग्रामीण भागातील प्रसारशक्ती आहेत-आ.थोरात

संगमनेर:- कोरोना सारखे कितीही संकटे आली व सोशल माध्यमांची स्पर्धा कितीही वाढली तरी मुद्रित माध्यमांचे महत्व कधीही कमी होणार नाही. वृत्तपत्रांनी उथळ बातम्या देण्याऐवजी विश्लेषणात्मक लेखन आपल्या वृत्तपत्रातून करावे आणि ती काळाची गरज आहे. सध्या राजकारणाचा दर्जा झपाट्याने घसरला आहे. अशा वेळी माध्यमांनी सवंग लोकप्रियतेसाठी धावणाऱ्या वाचाळ नेत्यांना माईक व लेखनी बंदी करावी तरच माद्यमांचा दर्जा टिकवून राहील. आज एखादी संघटना स्थापन करणे व ती चालविणे महाकठीण काम आहे. परंतू संपादक किसन भाऊ हासे संपादक व पत्रकार सेवा संघाच्या माध्यमातून छोट्या वृत्तपत्राचे नेतृत्व जिद्दीने करीत आहेत. ही अभिमानाची बाब असल्याचे प्रतिपादन राज्याचे माजी महसूलमंत्री आ. बाळासाहेब थोरात यांनी केले.

संपादक व पत्रकार सेवा संघ महाराष्ट्र मुंबई संघटनेच्या वतीने रविवारी संगमनेरात संपादक राज्य परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी आ. थोरात बोलत होते. व्यासपीठावर माजी. आ. डॉ. सुधीर तांबे, माजी नगराध्यक्षा सौ. दुर्गाताई तांबे, डॉ. वि.ल. धारुकर, संघटनेचे अध्यक्ष किसन भाऊ हासे, ॲड. इलियास खान, डॉ. हेमंत जोशी, डॉ. नामदेवराव गुंजाळ, संपादीका सौ. सुशीला हासे, जिल्हाध्यक्ष मनोज आगे, सचिव नरेंद्र लचके, संपादक जयपाल पाटील तर दुसऱ्या सत्रात प्रमुख पाहुणे आ. सत्यजीत तांबे उपस्थित होते.

पुढे बोलतांना आ. थोरात म्हणाले की, ग्रामीण भागातील छोट्या मोठ्या घडामोडी व जनतेचे प्रश्न सरकारपुढे मांडण्याचे काम छोटी वृत्तपत्रे करतात. या छोट्या वृत्तपत्रांच्या अनेक समस्या आहे. संपादक किसन भाऊ हासे संपादक व पत्रकार सेवा संघाच्या माध्यमातून त्यांच्या प्रश्नांसाठी शासन स्तरावर नेहमी संघर्ष करीत असतात. आमचा त्यांच्या संघर्षाला नेहमी पाठिंबा असतो. वृत्तपत्रे हे उथळ बातम्यांपेक्षा सविस्तर व विश्लेषणात्मक घटना जनते पर्यंत पोहचवित असल्यामुळे त्यांचे महत्व कधीही कमी होणार नाही. वृत्तपत्रांनी काळानरुप बदल करुन बातम्यांबरोबरच विश्लेषणात्मक लेखन अग्रक्रमाणे करावे अशी अपेक्षा आ. थोरात यांनी व्यक्त केली. संपादकांनी आपल्या प्रश्न संदर्भात आपआपल्या जिल्ह्यातील लोक प्रतिनिधींकडे, प्रशासनाकडे सविस्तर निवेदन द्यावे. आम्ही राजकीय पक्ष म्हणून विधिमंडळात या प्रश्नावर सरकारला जाब विचारू असे आश्वासन दिले. राज्यातील विविध भागातून संपादक संगमनेरात परिषदेसाठी आले होते. हासे यांच्या माध्यमातून या संपदकांशी आपल्याला

हितगूज साधता आले असे मत यावेळी त्यांनी व्यक्त करीत संघटना बांधणी व वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

संपादक परिषदेचे प्रास्तविक किसन भाऊ हासे यांनी करतांना सांगितले की, राज्यात सुमारे अडीच हजारांपेक्षा जास्त छोटी वृत्तपत्रे प्रकाशित होतात. सरकारचे ध्येय, धोरण, योजना ग्रामिण भागातील जनतेपर्यंत पोहचविण्याचे काम भांडवली वृत्तपत्रांपेक्षा हे छोटे वृत्तपत्र करीत असतात मात्र शासन जाहिरात वाटप धोरणात याच छोट्या वृत्तपत्रांवर अन्याय करीत असतात. जाचक नियम , अटी लावून या छोट्या वृत्तपत्रांवर निर्बंध लादण्याचे काम सरकारकडून केले जाते. त्यामुळे न्याय हक्कांसाठी संघटीतपणे मुकाबला करण्यासाठी संपादक व पत्रकार सेवा संघ सातत्याने लढा देत आहे. अधिस्विकृती कमिटीम ध्येही जाणीवपूर्वक छोट्या वृत्तपत्रांवर अन्याय केला जातो. हा अन्याय दुर करण्यासाठी यापुढे आपल्याला अधिक जोमाने लढावे लागेल अशी भावना यावेळी संपादक किसन भाऊ यांनी व्यक्त केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे वृत्तपत्र विद्या व जनसंवाद माजी विभाग प्रमुख प्रा. डॉ. वि. ल. धारुरकर यांनी वृत्तपत्राचे महत्त्व, समस्या व त्यांच्याकडून असणाऱ्या अपेक्षा यावेळी सविस्तर विस्तृत केल्या. छोटी वृत्तपत्रे म्हणजे ग्रामीण भागाचा आरसा असतात. ग्रामीण भागातील छोटे-मोठे प्रश्न ऐरणीवरुन आणून त्यांचे निरसन करण्यासाठी शासनावर दबाव आणण्याचे काम छोटी वृत्तपत्र करीत असतात. विकासाचे व प्रगतीचे अडकवून पडलेले प्रवाह खुले करण्याचे काम प्रामुख्याने छोटी वृत्तपत्र करत असताता. लोकशाहीचे रक्षक असणाऱ्या माध्यमांनी कुणाच्या डोक्यासमोर नतमस्तक होऊ नये. तंत्रज्ञानाबद्दल आंधरात राहू नका, अंधळेपणाने कोणाचीही बाजू घेऊ नका, आज जग छोटे झाले आहे. आपली एक छोटी बातमी सुद्धा जगाच्या कानाकोपऱ्यात जाऊन खळबळ उडवू शकते. छोट्या वृत्तपत्रांसमोर, तंत्रज्ञान, मुद्रण, वितरण, जाहीरात हे मुख्य प्रश्न असले तरी तुम्ही समाजाचे छोटे-मोठे प्रश्न मांडल्यास समाज आपल्या पाठीशी उभा राहील. अशी अपेक्षा यावेळी त्यांनी व्यक्त केली.

यावेळी आ. सत्यजीत तांबे यांनी छोट्या वृत्तपत्रांचे महत्त्व विशद करत त्यांच्या प्रश्नांसाठी आपण शासन दरबारी लढा देऊ असे अश्वासन दिले. सौ. दुर्गाताई तांबे, बाळासाहेब आंबेकर, मनोज आगे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन युवावार्ताचे कार्यकारी संपादक सुदीप हासे यांनी केले तर आभार नरेंद्र लचके यांनी मानले. यावेळी केशवराव तुपे-छ. संभाजीनगर, प्रफुल्ल नेवे-जळगाव, ॲड. इलियास खान- जालना, पीआर पाटील-लातूर, विजय लक्ष्मण पवार-कोल्हापूर, धनश्री पालांडे-रत्नागिरी, चंद्रकांत खंडेलवाल-गोंदिया, राजेंद्र दणके-पुणे, विलास डोळसे-बीड, उद्धव बाबर-सातार, हेमंत जोशी-पालघर, अनिरूद्ध बडवे-सोलापूर, उत्तम काळे-परभणी, मधुकर बावणे-नागपूर, हिवारज उके-भंडारा, नरेश गुजराथी-नाशिक व इतर जिल्ह्यातील संपादक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दैनिक युवावार्ता परिवार, संपादक व पत्रकार सेवा संघाच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

खासदार बाळू धानोरकर यांची प्राणज्योत मालावली..

चंद्रपूर- चंद्रपूरचे खासदार बाळू धानोरकर यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना दिल्ली येथील रुग्णालयात भरती करण्यात आले होते. मात्र मंगळवारी पहाटेच्या सुमारास त्यांचे उपचारादरम्यान निधन झाले. ते ४८ वर्षांचे होते.कट्टर शिवसैनिक ते काँग्रेस असा परस्पर विरोधी विचारांचा प्रवास करीत अतिशय अल्पकाळात राजकारणात स्वसामर्थ्यावर ओळख निर्माण करणारे राज्यातील काँग्रेसचे एकमेव खासदार चंद्रपूरचे बाळू धानोरकर यांच्या अकाली निधनाने एक संघर्षशील नेता काळाच्या पडद्याआड गेला आहे.

विशेष म्हणजे गेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने आधी उमेदवारी नाकारली होती, पण नंतर बदल झाला. उमेदवारी मिळाली आणि धानोरकर हे राज्यातून एकमेव काँग्रेसचे खासदार निवडून आले होते.

खासदार बाळू धानोरकर पार्थिव दिल्ली येथून नागपूरमार्गे वरोरा येथे आणण्यात आले.आज मंगळवारी रोजी दुपारी २ वाजेपासून ३१ मे रोजी सकाळी १० वाजेपर्यंत वरोरा येथील निवासस्थानी दर्शनासाठी ठेवण्यात येईल. त्यानंतर ३१ मे रोजी वणी - वरोरा बायपास मार्ग येथील मोक्षधाम येथे सकाळी ११ वाजता अंत्यसंस्कार करण्यात येईल अशी माहिती सूत्रांनी दिली.



चंद्रपूरचे काँग्रेस खासदार बाळू धानोरकर महाराष्ट्रातील एकमेव काँग्रेस खासदार होते. ४८ वर्षाच्या अल्पवयात त्यांनी कट्टर शिवसैनिक ते खासदार असा थक्का करणारा प्रवास केलाय.२६ मे रोजी त्यांना नागपुरात किडनी स्टोनच्या शस्त्रक्रियेसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. यानंतर गुंतागुंत निर्माण झाल्याने त्यांना नवी दिल्लीच्या मेदांता रुग्णालयात उपचारासाठी भरती करण्यात आले. ते उपचाराला प्रतिसाद देत असतानाच त्यांची मंगळवार ३० मे रोजी पहाटे प्राणज्योत मालवली. दोन दिवसाआधी कुटुंबाचा आधारवड पिता नारायण धानोरकर यांचे निधन झाले होते.

२००९ मध्ये त्यांनी सर्वप्रथम वरोरा - भद्रावती विधानसभा निवडणूक लढविली. पण पराभूत झाले. त्यानंतरही पाच वर्षांत संपूर्ण मतदार संघ पिंजून २०१४ ची निवडणूक काँग्रेस नेते संजय देवतळे यांच्या पराभव करून जिंकली. नगरपालिका निवडणुकीवरून सेनेतील वरिष्ठांशी मतभेदांमुळे त्यांनी २०१९ मध्ये शिवसेनेना सोडली व काँग्रेस प्रवेश केला चंद्रपूर- वणी लोकसभा मतदारसंघातून उमेदवारीसाठीही त्यांना संघर्ष करावा लागला. काँग्रेसच्या स्थानिक नेत्यांनी त्यांच्या उमेदवारीला विरोध केला होता. विनायक बांगडे यांची उमेदवारी जाहीर झाली होती. पण धानोरकर यांची निवडून येण्याची क्षमता लक्षात घेऊन शेवटच्या क्षणी काँग्रेसने उमेदवार बदलून धानोरकर यांना रिंगणात उतरविले. त्यांच्या पुढे भाजपचे हंसराज अहिर यांच्यासारखे प्रबळ उमेदवार होते. या मतदारसंघात मोठ्या संख्येने धनोजे कुणबी समाज आहे. धानोरकर हे याच समाजाचे प्रतिनिधीत्व करीत होते. त्यांच्या रूपात प्रथमच समाजाला निवडणुकीत प्रतिनिधित्व मिळाल्याने धानोरकर यांनी लोकसभेची निवडणूक जिंकली. राज्यातून काँग्रेसला मिळालेली ही एकमेव जागा होय. त्यानंतर त्यांनी मागे वळून बघितले नाही. २०१९ मध्ये त्यांनी त्यांच्या पारंपरिक वरोरा - भद्रावती मतदार संघातून पत्नी प्रतिभा धानोरकर यांनाही आमदार म्हणून निवडून आणले. भद्रावती नगर परिषदेत धानोरकर यांची सलग १५ वर्षापासून एकहाती सत्ता आहे.

संपादकीय

अखंड भारत: बहुजनांचा की संघाचा!

भारतीय जनता पक्ष सत्तेत आल्यापासून ज्या प्रकारे त्याची वाटचाल होत आहे त्यावरुन असे दिसते की भाजपला हा देश पूर्णतः एकसन्ध करायचा आहे. आणि ही भूमिका जी आहे ती रा. स्व.संघाच्या अखंड भारताची आहे. यावरुन हा देश अखंड ठेवायचा म्हणजे तो कुठल्या विचाराने, कुठल्या प्रकारे चालणार, सत्ता कशी राबवणार हे ठरवण्याचं काम सुद्धा संघनीतीचं आहे आणि त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी ही भाजपच्या माध्यमातून करण्याचं घाटत आहे. आणि प्रत्यक्षपणे तशी अनेक पावले सरकारने उचलली आहेत. याला संघ अखंड भारत या संकल्पनेत बसवत आहे. आणि ही संकल्पना हा देश एक चालकांनुवर्ती असावा. एकाच भूमिकेतून चालावा आणि ती भूमिका संघाची असावी अशा प्रकारे वाटचाल होत आहे.

काही दिवसांपूर्वी ज्या प्रकारे दिल्लीच्या राज्य सरकारचे अधिकार केंद्र सरकारने सुप्रीम कोर्टाला न जुमानता अध्यादेश काढला याचा अर्थ या देशामध्ये राज्यांना किंवा निवडून आलेल्या पक्षांना अधिकार राहणार नाहीत असा आहे. आणि लोकांमधून निवडून आलेले सरकार हे एक प्रकारे लंगडे सरकार असेल. त्याच्या हातात अधिकार राहणार नाहीत. ते केवळ नाममात्र सरकार असेल अशा प्रकारची ही संघाची किंवा केंद्र सरकारची भूमिका दिसत आहे. आणि आश्चर्य म्हणजे या भूमिकेला पायबंद घालण्याची सोय संविधानामध्ये पण नाही. म्हणजे सत्ताधारी पक्ष जर मोठ्या संख्येने सत्तेत असेल तर तो पक्ष सुप्रीम कोर्टाने दिलेला निवाडा देखील बाजूला ठेवू शकतो. ही एक भयंकर चाल आहे. आणि ही एकचालकानुवर्ती सत्ता प्रकार म्हणजे संघप्रणित सत्ता!

आणि हा जो देश एकसंध ठेवण्याचा प्रकार आहे तो या देशातील विविधता, या देशातील विविध जमाती, जाती आणि या देशातील विभिन्न संस्कृती आणि भाषा या सर्वांना दुय्यमतेत ठेवून केवळ संघ म्हणेल तीच सत्ता,भाषा, तीच संस्कृती अशी ही एकाधिकारशाही राहणार आहे.

म्हणजे हा देश एका संघटनेच्या विचारानुसार चालेल आणि ती संघटना जर विषमतावादी असेल, उच्चनीचतावादी असेल आणि अन्य धर्मीयांचा द्वेष किंवा त्यांचे शत्रुत्व सांगणारी असेल तर हा देश विषमतावादाच्या भोवऱ्यात गटांगळ्या घालणारा राहील आणि या देशातला बहुजन समाज, या देशातले सर्व धमीय लोक हे संघ म्हणेल त्या धर्माचे गुलाम होतील.

राज्य सरकाराना काही अधिकार नाही हे दिल्लीच्या बाबतीमध्ये जे घडले त्यावरून होताना दिसते आहे. आणि हीच भूमिका जर इतर राज्यांसाठी घेतली किंवा लागू केली तर या देशांमध्ये जी राज्य सरकारे आहेत ती सरकारे देखील केवळ नाममात्र राहतील. पंगू राहतील. त्यांच्या हातात काही अधिकार राहणार नाहीत. आणि सर्व अधिकार केंद्र सरकार मध्ये केंद्रीत राहतील. हा देश संघाच्या एकसंध भूमिकेत असणे म्हणजे तो एका विचारधारेच्या लोकांच्या ताब्यात असणे होय.

आव्हानाची व्याप्ती

म्हणून आज दिल्ली राज्यासमोर असणारे हे आव्हान केवळ दिल्ली सरकारसाठी नाही तर हे सर्व राज्यांसाठी येऊ घातलेले आहे. जे विविध प्रांतीय पक्ष आहेत त्यांच्यावर हा मोठा आघात आहे. आणि हा आघात राज्यकर्त्यावरच राहणार नाही तर पुढे जाऊन या देशांमध्ये संघ म्हणेल तशा प्रकारची सत्ता लोकांवर शासन करेल.म्हणजे या देशांमध्ये पुन्हा पेशवाई सदृश्य सत्ता हावी होणार की काय असं वाटते. आणि हे किती लोक गंभीरपणे लक्षात घेतात? त्यांच्या मनातला अखंड देश किंवा ज्याला युनिटरी स्टेट म्हणतात आणि संघ ज्याचा पुरस्कार करतो ही संकल्पना विषमतेवर आधारित आहे.

डॉ.आंबेडकर आणि युनिटरी देश

समजा डॉक्टर आंबेडकरांनी युनिटरी स्टेटला पाठिंबा दिला असेल, हा देश एकसंध असावा असे म्हटले असेल तर त्यांच्या मनातली सामाजिक रचना ही समतेवर आधारित होती किंवा आहे आणि म्हणून डॉक्टर आंबेडकरांनी देखील अखंड देशाची कल्पना मांडली अशा प्रकारचा भ्रामक प्रचार संघाचे लोक करू शकतील आणि म्हणून त्याला बळी न पडता संघाचा अखंड देश हा विषमतावादाचा देश आहे, हा जातीव्यवस्थायुक्त देश आहे, हा अन्य धमीयांना शत्रू ठरवणारा आणि त्यांच्यामध्ये सतत शतृत्व राहील अशा प्रकारची भूमिका राबवल्या जाणार आहे. म्हणून या देशातील दलित असतील, ओबीसी असतील, आदिवासी असतील किंवा मुस्लिमादि लोक असतील त्या सर्वांनी संघाच्या अखंड देश प्रकाराला विरोध करायला पाहिजे.

या देशाची अखंडता ही विषमतेसह राहणार, जातीव्यवस्थेसह राहणार की समतावादी राहणार अशा प्रकारची ही अटीतटीची वेळ आहे आणि म्हणून यावर गंभीरपणे विचार करायला पाहिजे. ज्या संघटना म्हणतात आम्ही आंबेडकरवादी आहोत फुलेवादी आहोत किंवा समतावादी आहोत त्या सर्व संघटनांनी यावर गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे केवळ राजकारण करत काँग्रेसच्या भोवती किंवा भाजपाच्या भोवती जर तुम्ही राजकारणात असाल तर तुम्ही या संकटाकडे गंभीरपणे पाहू शकत नाही. आणि म्हणून ही गंभीरपणे घेण्याची बाब आहे. ती सर्वसाधारण राजकारणी लोकांच्या लक्षात येणार नाही. म्हणून असं वाटतेकी सम तावादी संघटना व समतावादी लोकांनी उथळपणे राजकारण करणाऱ्या लोकांच्या लक्षात ही गंभीर बाब आणून द्यायला हवी. हा देश अखंड असावा असं जर वाटत असेल आणि तो जर संघाच्या घशात राहू नये असं वाटत असेल तर गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे. त्या विरुद्ध मानसिकता घडवण्याची गरज आहे देश फेडरल असावा की युनिटरी असावा म्हणजे राज्यांना अधिकार असावे की केंद्राला सर्व अधिकार असावे ही भूमिका अगोदर सुद्धा चर्चेत होती.

इंग्रजानी केलेला

१९३५ चा जो कायदा होता तो हा देश फेडरल असावा अशा प्रकारचा होता. परंतु ती भूमिका बदलण्यात आली आणि हा देश जबरीने एकत्र करण्यात आला. *अमेरिका देश* अमेरिकेतली जी राज्ये आहेत ती स्वखुशीने एकत्र आलेली आहेत. म्हणून अमेरिका हा राज्यांचा संघ आहे. राज्यांना स्वातंत्र्य आहे. म्हणून तो जास्त फेडरल देश आहे.

अब्राम्हणी संस्थाने

या देशात स्वातंत्र्य मिळायच्या आधी जी संस्थाने होती ती संस्थाने ब्राह्मणी नव्हती. अनेक संस्थांने मुसलमानांच्या ताब्यात होती. जी बहुजनांच्या वा मराठ्यांच्या ताब्यात होती ती संघ विचारांची नव्हती. म्हणजे ब्राह्मणी विचाराची नव्हती. उदाहरण द्यायचे असेल तर शाहूच्या कोल्हापूर संस्थानाचे, बडोद्याचे गायकवाड यांच्या संस्थांनाचे देता येईल. आणखी अशी उदाहरणे आपल्याला दिसतील. उदाहरणार्थ मुस्लिमांच्या ताब्यात असणारा हैद्राबाद निजामचा भाग हा देखील केंद्रीकरणाच्या विरोधी होता. परंतु अशा राज्यांना जबरदस्तीने विलिन करण्यात आले.

म्हणजे निजामच्या राज्यावर आक्रमण करून विलीन करण्यात आले. आणि हे काम वल्लभभाई पटेल यांनी केले. म्हणून रा.स्व. संघ पटेलांची आजही तरफदारी करतो. त्याचप्रमाणे गोव्याचे विलीनीकरण हे देखील ब्राह्मणी भूमिकेतून झाले आहे. कारण इंग्रज वा इतर पाश्चात्य लोक हे ब्राह्मणी विचाराचे नव्हते. त्यांची सत्ता जातवादी नव्हती. त्यांची सत्ता परकीय असली तरी विषमतावादी नव्हती. म्हणून महात्मा फुल्यांनी इंग्रजांच्या सत्तेला मानवतावादी म्हटले होते आणि ब्राह्मणांच्या पेशवे सत्तेला कडाडून विरोध केला होता. म्हणजे या देशातील ब्राह्मणी सत्ता ही इंग्रजाच्या सत्तेपेक्षा जास्त अमानवी आहे अशी त्यांची भूमिका होती. कारण इंग्रज कुणाला नीच, अस्पृश्य म्हणत नव्हते, ठरवत नव्हते. ते म्हणजे ज्या भट ब्राम्हणशाहीचा विरोध फुले आंबेडकरांनी केला, इथल्या समस्त समतावाद्यांनी केला; आज त्यांचीच सत्ता या देशांमध्ये आली आहे, आणि एकदा सत्ता त्यांच्या ताब्यात आली की ते ती सत्ता कधी सोडत नाही.

१९४७ चे षडयंत्र

आम्ही संघावरील एका पुस्तकात असे वाचले आहे. (त्याचे शीर्षक आणि लेखकाचे नाव त्यात नाही कारण ते जुन्या बाजारातून मिळाले होते. त्याची पहिली काही पाने गायब आहेत.) त्यात असे म्हटले आहे की १९४७ सालीच गोलवालकरांनी (संघाने) या देशाची सत्ता ताब्यात घेण्याची आखणी आणि तयारी केली होती. परंतु त्यांचा तो प्लॅन थोडक्यात फसला आणि म्हणून १९४७ साली हा देश संघाच्या ताब्यातून वाचला. परंतु आज तो खऱ्या अर्थाने संघाच्या ताब्यात गेलेला आहे. म्हणजे एक प्रकारे पेशवाई सदृश्य सत्तेच्या ताब्यात गेला आहे.

ही सत्ता घालवण्याचे माध्यम निवडणूक आहे का?

निवडणुकीच्या माध्यमातून संघाची सत्ता घालवता येईल हा एक भ्रम आहे. आणि म्हणून जोवर इथली सामाजिक रचना ब्राह्मणी आहे, लोक मानसिकता ब्राह्मणी आहे तोवर संघ या देशावरची घट्ट पकड सोडणार नाही आणि म्हणून भाजपवाले म्हणतात की प्रादेशिक पक्षाचे अस्तित्व नाहीसे करण्याची आमची भूमिका आहे. आणि भाजपाच्या अध्यक्षांनी तसे बोलूनही दाखवले आहे. ही गंभीर बाब फार कमी लोक लक्षात घेतात. आणि म्हणून समस्त समतावादी विचारकांनी, कार्यकर्त्यांनी या दृष्टीने विचार करायला हवा. केवळ टीका केल्याने ते सत्ता सोडणार नाही. ते टीके कडे लक्ष देत नाही, भीक घालत नाही. त्यांनी निर्माण केलेली लोकमानसिकता पराभूत करण्यावर भर द्यायला पाहिजे.

बहुजनांना या देशांमध्ये समता हवी असेल, वामनी गुलामीतून मुक्त व्हायचं असेल तर हा देश रा. स्व. संघाच्या तावडीतून मुक्त करावा लागेल. त्याच्या ब्राम्हण केंद्रित अखंड भारत या भूमिकेतून देशाला मुक्त करावे लागेल. खरं म्हणजे ही जी काही संघाची भाजपच्या माध्यमातून सत्ताचाल चालू आहे ती त्याच्या आम्ही देशाचे मालक आहोत या भूमिकेशी जुळणारी आहे.

नागेश चौधरी नागपूर

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

तेल्हारा जि.अकोला,परिसरातील सत्यशोधक चळवळ

सतीश जामोदकर
हिवरा बु.मानोरा, वाशिम मो.९४२३३७४६७८

अकोट जि.अकोला तालुक्याचे विभाजन होऊन तेल्हारा तालुका नवीन निर्माण झाला. तेल्हारा शहराच्या आसपास असलेल्या गावात सुद्धा सत्यशोधक चळवळीच्या शाखा कार्यरत होत्या असे दिसून येते.

तेल्हारा: १९३६ साली दीनमित्र ज्युबिली अंक काढण्यात आला. त्यामध्ये तेल्हारा शहरातील तिघांचे लेख आढळतात. एक सेक्रेटरी तुळशीराम नामदेव मराठा पाटील त्यांनी लिहिलेल्या पत्रात दीन मित्रकारास म्हटले आहे की दीनमित्र पत्र सुरु झाले तेव्हापासून आज पावेतो त्याने सामाजिक, धार्मिक व आर्थिक बाबतीत केलेली कामगिरी शब्दात लिहिता येत नाही. गरीबी स्थितीत एवढी कामगिरी करणे मुबलकीचे आहे. असे म्हणून दीनमित्राच्या कार्याचे अभिनंदन केले आहे. थोर कामगिरी या मथळ्याखाली वरील मजकूर प्रसिद्ध झाला आहे.

तेल्हारा येथील दुसरे सद्गृहस्थ केशव आप्पाजी देशमुख यांनी सत्यमेव जयते म्हणून पत्र लहान पण कार्य थोर. या मथळ्याखाली लिहिले की, मी सतत एकवीस वर्षापासून दीनमित्र वाचीत आहे. याचा अर्थ ते १९१४ पासून दीनमित्राचे वर्गणीदार होते. जे लोक दीनमित्रचे वर्गणीदार होते ते सत्यशोधक समाजात कार्य करीत होते. त्यांनी वर्ण भेद, जाती भेद कमी होण्यास दिनमित्राच कारणीभूत आहात असे म्हटले. शेतकरी व स्त्रिया याज करिता सुद्धा आपण कार्य केले तर सत्यशोधक मताचा भार आपला होता म्हणून सांभाळला गेला आहे. असे म्हटले आहे. दीनमित्र दिसण्यास लहान असले तरी त्याचे कार्य मोठे आहे हे एक विशेष होय. माझे काही ख्रिस्तबंधू व मुसलमान बंधू सुद्धा दीनमित्रांचे कौतुक करीत होते असे म्हटले आहे.

याच अंकात आपला एक अनोळखी मित्र टी.एम. जगधने (ख्रिस्ती) तेव्हा आर.टी. यांनी आनंदाच्या लहरी या मथळ्याखाली छोटेखानी लेखात म्हटले की, मी तीन महिन्यापासून मी तेल्हारा मुक्कामी श्री सत्यशोधक समाजाचे सेक्रेटरी तुळशीराम यांच्या सहवासात असलेले म्हटले आहे. ते दिनमित्र पत्रास व त्याच्या सेवेस दीर्घायुष्य मिळो असे म्हणतात. समाजसेवा करणे फार मोठे काम आहे. जनसेवा करण्यासाठी आपणास झीज सोसावी लागते. जनापवाद ऐकावे लागतील तेव्हा शुद्धतेचे सावकाश फुल उमलते. तेल्हारा येथे नारायण पंढरी पाटील व आण्णा रामजी भोंजे यांच्या अध्यक्षतेखाली सभा झाली. त्यात राजर्षी शाहू महाराज यांच्या निधना बद्दल दुख व्यक्त करण्यात आले. सदाशिव कृष्णराव यांनी शाहू महाराजांच्या गुणगौरव केला. अशाप्रकारे तेल्हारा शहरात सत्यशोधक समाज कार्यरत होता.

तेल्हारा शहराच्या आजूबाजूला असणाऱ्या गावात सत्यशोधक समाजाच्या शाखा होत्या. त्याचा उल्लेख महात्मा जोतीराव फुले यांचे समकालीन असलेले नारायण रघुनाथ नवलकर यांचा मुलगा हरिश्चंद्रराव नारायणराव नवलकर, हेडमास्टर श्री आनंदस्वामी इंग्लीश स्कूल मु.वडगाव रासाई, पोस्ट पारगाव, जि.पुणे यांनी महात्मा जोतीराव फुले यांच्या निधनानंतर सचिव म्हणून कार्य केले. त्यांनी सत्यशोधक महासाधू श्री तुकाराम महाराज हे पुस्तक लिहिले. ते १९२९ साली त्यांनी लक्ष्मण भाऊराव कोकाटे, हनुमान प्रेस, ३०० सदाशिव पेठ, पुणे शहर येथे प्रकाशित केले. आणि हे पुस्तक वऱ्हाडातील त्यावेळचे झुंझार व्यक्तीमत्व अभ्यासक असलेले क्षत्री यांचा इतिहास लिहिणारे काशिराव देशमुख, शिरजगाव बंड, ता. चांदूरबाजार, संपादक सुबोध ग्रंथमाला, अमरावती यांना अर्पण केले होते. त्या पुस्तकाची नवीन आवृत्ती मराठा सेवा संघाचे प्रकाशन जिजाईच्या वतीने डॉ. अशोक चोपडे यांनी संपादीत केले. त्या पुस्तकाच्या शेवटी कित्येक ठिकाणचे सत्यशोधक समाज म्हणून महाराष्ट्रा भरातील शाखेच्या अध्यक्ष आणि सेक्रेटरीचे नावे आहेत. त्यात तेल्हारा तालुक्यातील गाडेगाव, घोडेगाव, वरुड, बिहाडे, भांबेरी, मनबदा आणि वाडी आदमपूर या गावांचा उल्लेख आहे.

गाडेगाव: त्यावेळचे या गावचे पोस्ट तेल्हारा होते. तेल्हारा या शहरापसून अवघ्या तीन-चार किलोमीटर अंतरावर असणारे सधन गाव या गावातील सत्यशोधक शाखेचे अध्यक्ष होते श्री नामदेव किसन मराठा तर सेक्रेटरी होते श्री. बाबन बापूजी मराठा, नामदेव किसान मराठा यांचे आडनाव वाकोडे असून ते गावात ब्राम्हणेत्तर पुरोहिताचे काम करीत असत. या गावामध्ये बाबान बापुजी बोंडे, पुंडलीक धबडगाव, लक्ष्मण काळे, पुंडलिक वाकोडे, महादेव वाकोडे ही मंडळी काम करीत होती.

दुसरे सेक्रेटरी म्हणून काम करणारे बाबन बापुजी हे बाबन मुकाजी बोर्डे होत. त्यांचा मृत्यू १६-०२-१९८० साली झाला. बाबन त्यांचे टोपणनाव होते. तर जानजी हे त्यांचे मुळनाव होते. त्यांचा मुलगा प्रल्हाद ज्ञानजी बोर्डे हे कृषी अधिकारी म्हणून अकोला येथे कार्यरत आहे. नामदेव किसन वाकोडे यांना चार मुले होती. काशीराम, तुळशीराम, जयराम व श्रीराम त्यांचा श्रीराम या मुलाची मुलाखत घेतली त्यास सुधाकर, कैलास व गजानन ही मुले आहेत.

घोडेगाव: घोडेगाव तेल्हारा या आजच्या तालुक्याच्या ठिकाणापासून साधारणपणे चार-पाच किलोमीटर अंतरावर असून सदर गावात मुस्लीम वस्ती मोठ्या प्रमाणात आहे. गाव सधन असून या गावातील शाखेचे अध्यक्ष होते श्री मारुती नथू म.पा. होते. म.पा. म्हणजे मराठा पाटील, परंतु त्यांचे वंशज आता येथे कुणीच नाही. त्यामुळे त्यांची माहिती मिळत नाही.

दुसरे गृहस्थ सेक्रेटरी श्री महादेव भोमाजी म.पा. यानचे वडीलांचे नाव भोमाजी नसून भोजाजी होते. आडना दुधाट त्यांचा जन्म अंदाजे १९०५ सालच्या असावा ते ९० वर्षापेक्षा जास्त जगले. १० फेब्रुवारी १९९८ ला त्यांचा मृत्यू झाला. त्यांचे शिक्षण ७ वी पर्यंत झाले होते. ते तेल्हारा येथील कापूस अडत्याकडे नोकरी करीत असत. काशीराव बापू देशमुख यांनी लिहिलेली सुबोध सत्यनारायण पोथी ते सत्यनारायणाऐवजी वाचत होते. ही जीर्ण झालेले पोथी पुन्हा त्यांचे पुत्र दीपक श्रीराम दुधाट यांनी लिहून काढलेली आढळली. महादेव भोजाजी श्रावणीचे काम गावात करीत. ब्राम्हणेत्तर पुरोहीत म्हणून ते कार्य करीत असल्यामुळे त्यांना व त्यांच्या कुटुंबियांना गावातील लोकांनी वाळीत सुद्धा टाकले होते. पुढे सत्याची ओळख झाल्यानंतर लोक सन्मानाने वागवत होते. सुरुवातीला आर्थिक परिस्थिती बेताची होती. तरी ते मुंबई, पुणे येथे कार्यक्रमासाठी जात होते. याच गावातील रामदास काशीराव ढोले यांनी सत्यशोधकी जलशातील एक आठवण असलेले पत्र म्हणून दाखविले. विद्या शिकवा मुला-मुलींना, गायीच्या गेल्या झुंडा मला जेनू घाला. महादेव भोजाजी यांना पुरुषोत्तम हा मुलगा असून त्यांना मुकुंदा आणि गोविंदा ही दोन मुले आहेत.

भांबेरी: येथे श्री शिवाजी ऑफीस या नावाने समाजकार्य चालले होते. अध्यक्ष श्री त्र्यंबकराव देशमुख, सेक्रेटरी श्री जयरामजी मराठा पाटील तेल्हारा-आडसूळ या हमरस्त्यावरुन तीन किलोमीटर तर तेल्हारापासून साधारण सात-आठ किलोमीटर हे गाव आहे. या गावात त्र्यंबकराव तुकारामजी देशमुख हे सत्यशोधक समाजाचे अध्यक्ष होते. त्यांचा टोलेगंजवाडा आजही गावाच्या मध्यभागी अस्तित्वात आहे. त्र्यंबकरावांना विनायकराव, कृष्णराव, साहेबराव व माणिकराव अशी चार मुले होती.

या गावात रामचंद्र पुरुषोत्तम म्हणजे गुरुवर्य भाऊसाहेब हे संत होऊन गेले. त्यांनी गावात प्रबोधनाचे कार्य केले. वारकरी संप्रदाय स्थापन केला. या गावात श्रीराम संस्थान स्थापन करण्यात आले. त्याचे प्रथम विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष त्र्यंबकराव तुकारामजी देशमुख होते. त्यांचा गावात दरारा होता. त्यांचे पुत्र विनायकराव नंतर या संस्थानाचे अध्यक्ष होते. सद्यास्थितीत कृष्णराव यांचे पुत्र बबनराव अध्यक्ष आहेत. दुसरे गृहस्थ सेक्रेटरी श्री जयरामजी म.पा. यांचे पूर्ण नाव जयरामजी जिंदाजी काळे असून ते वर्ग ७ वा पास होते. त्यांनी ब्राम्हणेत्तर चळवळीत व स्वातंत्र्य चळवळीत काम केले. ते कुणबी समाज संघटनेत अग्रेसर होते. पुढे त्यांच्यावर गांधी विचाराचा प्रभाव पडला. त्यांचा मुलगा रामेश्वर जमरामजी हे राजकीय व्यक्तिमत्व म्हणून पुढे आलेत त्यांची गावचे सरपंच पद व जिल्हा परिषद सदस्य पद भूषविले. परंतु येथे शिवाजी ऑफीस या नावाने सत्यशोधकांचे कार्य चालत होते. याची माहिती कुणालाच नाही.

मनदा (मनब्दा): येथे सत्यशोधक श्री शाहू लायब्ररीतर्फे समाज कार्य चालले होते. अध्यक्ष होते ही आनंदाव संपतराव म.पा. तर सेक्रेटरी होते श्री भिकाजी संपतराव म.पा. या गावाचे नाव मनब्दा असून भांबेरी पासून आता जवळपास तीनेक किलोमीटर अंतरावर हे गाव आहे. पुर्वीचे मनब्दा आज अस्तित्वात नाही. या गावचे पुर्नवसन झाले असून मुळ गाव गावात एक दोन पडीक मंदिरे नदीच्या काठावर आपल्या गावखुणा राखून आहेत. पुर्नवसीत झाल्यामुळे या गावात त्या काळात अस्तित्वात असलेल्या सत्यशोधक समाजाची कुठलीच माहिती सदर अध्यक्ष व वंशजांना नाही.

आनंदराव संपतराव यांना श्रीराम नावाचा मुलगा होता. त्यांना चंद्रहाद, शेषराव, मुंगटराव, अजाबराव व पंजाबराव अशी पाच मुले होती. चंद्रहास यांना विलास, शेषराव यांना विश्वास व अनंता, मुंगुरराव यांना रवी व दीपक, अजाबराव यांना अनिल व संदीप तर पंजाबराव यांना महेश असे मुले आहेत.

दुसरे गृहस्थ सेक्रेटरी भिक्काजी संपतराव यांना मुरलीधर नावाचा मुलगा होता. त्यास हेमंत व शरद ही मुले आहेत. या गावात सत्यशोधक श्री. शाहू लायब्ररी होती. याची कुणालाच खबर नाही.

वरुड बु: येथील शाखेचे अध्यक्ष होते श्री नरहरी हरी पाटील सोनोने, तर सेक्रेटरी श्री. श्रीराम राजाराम सोनोने, असीस्टंट सेक्रेटरी होते श्री. गोपाळ कडतू बिहाडे, येथे समाजामार्फत श्री हनुमान लायब्ररी स्थापन करण्यात आली होती.

वरुड बु. हे गाव घोडेगाव गावापासून पुढे तीनेक किलोमीटर अंतरावर असून येथे बिहाडे आडनावाची अनेक घरे आहेत. म्हणून या गाला वरुड बिहाडे असही ओळखले जाते. अध्यक्ष श्री नरहरी हरी पाटील सोनोने यानच्या विषयी फारशी माहिती मिळत नाही. त्यांना अण्णा नावाचा मुलगा होता. त्यास निशा व रेखा नावाची मुलगी होती. निशा ही खापरखेड येथे नंदू पाटील पोटे यांचेकडे दिली तर दुसरी रेखा सोनोने हे पोलीस पाटील होती. तसेच ते अकोट तहसीलमध्ये ब्रीटीशकालीन मॅजेस्टेट होत्या. त्यांना ब्रिटीशांकडून तांदुळ मिळाला होता. (पदक) श्रीरामजी यांचा मृत्यू २० जानेवारी १९९६ ला झाला. त्यांच्या पत्नीचे नाव अन्नपूर्णाबाई होते. त्यांना श्रीकृष्ण, प्रल्हाद व उध्दव अशी तीन मुले होती. श्रीकृष्ण व उध्दव हे मयत असून प्रल्हाद हयात आहे. उध्दव यांच्या पत्नी असिस्टंट सेक्रेटरी असलेले गोपाळराव कडतुजी बिहाडे यांचा जन्म १९०७ सालचा असून मृत्यू २६ सप्टेंबर १९९६ ला झाला. हे त्यांच्या मिळालेल्या छायाचित्रावरुन कळते. त्यांना अजाबराव, भिमराव व बाबुराव ही मुले असून अजबारावांच्या पत्नी इंदुबाई यांनी सदर माहिती दिली. येथे स्थापन झाले हनुमान लायब्ररी लोकांना आठवते. परंतु तिची कोणतीही खुण अस्तित्वात नाही.

वरुड: अध्यक्ष श्री श्रीराम राजाराम म.पा. सेक्रेटरी श्री शिवराम भिकाजी व कुंभार समाजामार्फत येथे महात्मा फुले वाचनालय चालू आहे. अशी दुसरी माहिती सदर गावाविषयी सत्यशोधक महासाधू तुकाराम या पुस्तकात मागील माहितीच्या खाली आहे. श्रीराम राजाराम हेच अध्यक्ष असून सेक्रेटरी मात्र शिवराम भिकाजी म.कुंभार आहेत. शिवराम भिकाजी कुंभार यांचे आडनाव आगरकर असे आहे. त्यांचे पुतणे तुकाराम कडतू आगरकर यांचा मुलगा श्रीकृष्ण तुकाराम आगरकर यांनी दिलेल्या माहितीवरुन तुकाराम कडतू यांनी सत्यशोधक नाटिका शारदा नाटक बसविले होते. श्रीकृष्ण तुकाराम यांनी त्यांच्या आठवणीवरुन काही सत्यशोधकी जलशातील पदे मुखी आम्ही बामण बामण, आम्ही ब्रम्हदेवाचे लोक, आमचा जन्म दाढेतून, किंवा दुसरे पद डोई टक्कल छान, लग्न अजूनही लहान, दंताजीचे ठाणे उठले, कंबई होई कमान, अवघे पाऊनशेवयमान, लग्न अजूनही लहान, असे पदे श्रीकृष्णजींच्या स्मरणात आहेत.

वाडी अदमपूर: या शाखेचे अध्यक्ष होते श्री रामचंद्र सोनाजी म.पा. व सेक्रेटरी श्री लक्ष्मण बापुजी मराठा, तेल्हारापासून वरवटबकाल हमरस्त्यावर नऊ किलोमीटर अंतरावर वाडी अदमपूर हे दोन गावे आहेत. वाडी आणि अदमपूर या दोन गावाच्या मध्यभागी नाला वाहतो. रामचंद्र सोनाजी यांचे आडनाव वाघ असून त्यांना दोन बायका होत्या. एकीचे नाव सरुबाई तर दुसरी अहिल्याबाई, सरुबाई यांना भिका व गोविंदा असे दोन मुले असून अहिल्याबाई यांना पाडुरंग वाघ मयत असून त्यांचा मुलगा भगत पांडुरंग वाघ हयात आहेत. या गावात मराठा सेवा संघाची शाखा विशाल गणेश वाघ चालवितात व सत्यशोधकी परंपरा पुढे नेत आहेत. अंबादास यांना दोन मुले अनिल व संजय असून अंबादास याचे वय ८१ वर्ष आहे. ते वर्ग ४ था पास आहेत. त्यांनी सत्यशोधक समाजाची नोंदणी केली होती. रामचंद्र सोनाजी यांचा मृत्यू १९६१ साली झाला. ते भांबेरीच्या सत्यशोधक समाजाचे अध्यक्ष त्र्यंबकराव देशमुख यांच्याकडे कामाला होते. त्यांचाच प्रभाव त्यांच्यावर पडला असे दिसते.

दुसरे गृहस्थ सेक्रेटरी श्री लक्ष्मण बापुजी मराठा यांचे आडनाव चितोडे असून त्यांना आत्माराम, दयाराम व सारंगधर हे तीन मुले होते. त्यापैकी आत्मराम मयत असून दयाराम सारंग धर हयात आहेत. त्यापैकी दयाराम हे शिक्षक होते. लक्ष्मण बापुजी गावात पौराहिताचे काम करीत असत ब्राम्हणाशिवाय विधी होत होते. मुरलीधर रामचंद्र हे त्यांचे पुतणे असून त्यांनी सत्जशोधकी जलशाच्या आधारावरील कार्यक्रम या गावात सत्यशोधक मंडळी करीत त्यात ते विनोदी कलाकार म्हणून काम करीत. या गावातील तुकाराम भोंगू नव्हाव्याचे काम करीत तर लक्ष्मण बापुजी ब्राम्हणाचे काम करीत. येथील विठ्ठल मंदिरा समोर हे कार्यक्रम सत्यशोधक मंडळी करीत होते.

तंबाखू सेवन व्यसन समुपदेशन व उपचाराने हमखास बरा होतो

३१ मे तंबाखू सेवन विरोधी दिनानिमित्त विशेष...

तंबाखूची साथ ही आरोग्यावर आलेले सर्वात मोठे संकट आहे. गुटखा आणि तंबाखू खाल्ल्याने तोंडाचा कर्करोग होतो, हे आपण लहानपणापासून ऐकत आहोत. गावात, शहरात, राज्यात, देशात आणि जगभरात याबद्दल जनजागृती केली जाते. सिगारेटच्या पाकिटावर देखील कर्करोगाची भयानकता दर्शवणारे चित्रही प्रसिद्ध करण्याचे बंधन आरोग्य विभागाने घातले असून त्याचेही काटेकोर पालन होते. मात्र, तंबाखू खाण्याऱ्यांचे आणि सिगारेट ओढणाऱ्यांचे प्रमाण कमी होतांना दिसून येत नाही. या व्यसनामुळे नागरिक स्वतःहून कर्करोगासारख्या आजाराला निमंत्रण देतांना दिसून येतात. क्षणभराच्या नशेसाठी आणि तलफ भागवण्यासाठी तंबाखू, सिगारेटच्या आहारी जाणाऱ्या मंडळींमुळे कुटुंबाचे किती नुकसान होते, ही बाब आकलनापलीकडची आहे.

जगामध्ये दरवर्षी जवळपास ६३ लाख लोकांचा मुत्यू हा तंबाखू सेवनाने होतो. भारतात दररोज २ हजार ५०० व्यक्तींचा मृत्यू तंबाखूमुळे होतो. जागतिक आरोग्य संघटनेच्या अभ्यासानुसार सन २०३० पर्यंत ८० लाखांपेक्षा जास्त लोकांचा मुत्यू हा तंबाखू सेवनामुळे होण्याचे भाकीत केले आहे. एक बिडी किंवा सिगारेट ओढल्याम ुळे संबधित व्यक्तीचे आयुष्य हे साडेपाच मिनिटांनी कमी होते. हे सर्वेक्षणातुन वैद्यकीय तज्ज्ञांनी याबद्दल चिंता व्यक्त केली आहे. त्यावर उपाय म्हणून भारत सरकारद्वारे राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम सुरू करण्यात आला असून संपूर्ण जगामध्ये ३१ मे हा दिवस तंबाखू विरोधी दिवस म्हणून साजरा करण्यात येतो.

भारतात तंबाखू सेवनाने दरवर्षी दहा लाख लोकांना मुख कर्करोग होतो. यातील



एक तृतीयांश लोकांना मृत्यूस सामोरे जावे लागते. यावर्षी तंबाखू विरोधी दिनानिमित्त जागतिक आरोग्य संघटनेने "आपल्याला अन्नाची गरज आहे, तंबाखूची नाही' ही संकल्पना राबविण्याचे जाहीर केले आहे.

तंबाखू सेवनाने शारीरिक दुष्परिणाम :-

तंबाखू सेवनाने तोंडाची व केसांना दुर्गंधी येते. तंबाखूजन्य पदार्थ सेवनाने दात सडत जातात. हिरड्यांना इजा होते व दात निकामी होऊन त्यांची मजबुती नष्ट होते. दातांवर चॉकलेटी-पिवळे डाग पडतात. वास घेण्याची क्षमता कमी होते. चेहऱ्यावर सुरकुत्या पडतात. शरीरात अशक्तपणा येतो. हाडे ठिसूळ होतात व रोग प्रतिकारकशक्ती कमी होऊ लागते. डोळ्यांमध्ये जळजळ होते. तंबाखूमुळे तोंड, स्वरयंत्र, फुफ्फुस, गळा, अन्ननलिका, मूत्राशय, मुत्रपिंड, नाक, पोट, गर्भाशय व मुखाचा कर्करोग होतो. पुरुषांच्या शुक्राणूंची संख्या कमी होत जाते. ज्या महिला तंबाखूजन्य पदार्थाचे सेवन करतात त्यांची प्रजनन शक्ती कमी होते व स्त्रियांमध्ये वंधत्व निर्माण होते.

तंबाखू सेवन थांबविण्याचे फायदे :-

आरोग्य

क्रिकेटच्या सट्ट्यातील लुझर्सची पावले वळताहेत आत्मघाताकडे

गोंदिया: मित्राच्या सांगण्यावरुन सुरुवातीला मी क्रिकेटवर ऑनलाईन सट्टा लावला. दोन चारदा जिंकलो पण, मग त्याच मित्राने तुच बुकी म्हणून काम कर, सट्टा खेळविण्याचे तुला कमिशन मिळेल. मग मी आणि माझ्या मित्राने पण या कामाला सुरुवात केली. सुरुवातीला पाच-पाच दिवसातच यातून ५० हजार रुपयांचे कमिशन मिळाले. त्यामुळे आमची लालसा वाढली. पण यात जिंकल्यावर नव्हे तर सट्टा लावणारा हरल्यानंतर कमिशन मिळते. मात्र हरलेल्या दोन ग्राहकांनी सट्टा लावलेले २ लाख रुपये न दिल्याने आता आमच्यावरचे बुकी त्यासाठी तगादा लावत आहेत. हे पैसे आम्ही दिले नाही तर आमच्याकडे घर आणि गाव सोडून जाण्याचा अथवा आत्महत्या करण्याशिवाय दुसरा पर्याय राहिला नसल्याने गोंदिया शहरातील दोन अल्पवयीन बुकींकी आपले नाव व छापण्याच्या अटीवर प्रतिनिधीला सांगितले.

आयपीएल क्रिकेटमुळे सट्टा बाजाराला अलीकडे प्रचंड उधान आले आहे. कोणती टीम जिंकेल, कोणता प्लेअर किती रन काढेल यावर सुद्धा सट्टा लावला जातो. विशेष म्हणजे यात तरुणाईचा सर्वाधिक समावेश तर आहेच पर यात अलीकडे १५ ते १७ वयोगटातील अल्पवयीन मुले देखील प्रवेश करु लागली आहेत. तर बुकींकडून या अल्पवयीन मुलांना टार्गेट करण्यासाठी अल्पवयीन बुकी ठेवले जात आहे. हे बुकी शहरातील क्रिकेट मैदान अथवा त्यांच्या संपर्कातील मित्रमंडळींच्या माध्यमातून या अल्पवयीन मुलांना टार्गेट करीत आहे. त्यामुळे क्रिकेटच्या सट्ट्यात बुकींचे मुख्य टार्गेट अल्पवयीन मुले झाले आहेत.

गोंदिया शहरातील सुद्धा अनेक अल्पवयीन मुले याला बळी पडल्याची माहिती आहे. ही बाब त्यांच्या पालकांना सुद्धा माहिती आहे. पण आपलीच बदनामी होईल या भीतीने तग याची कुठेच वाच्यता करीत नाही. पण शहरातील एका पालकांनी हिम्मत करीत जे आपल्यासोबत झाले ते इतरांच्या मुलांसोबत होऊ नये व सट्टायाच्या मोहजालातून ते अडकू नये यासाठी त्यांनी पुढाकार घेत हा सर्व प्रकार बाहेर आणला. क्रिकेट सट्ट्याच्या व्यसनापोटी कर्जबाजारी झालेल्या नागपुरातील एका २० वर्षीय युवकाने आत्महत्या केली. तर मुलाच्या मृत्युने हादरलेल्या त्याच्या आईने फिनाईल पिऊन स्वत:चे जीवन संपविले. ही घटना सोमवारी घडली. ही घटना नागपुरची असली तरी क्रिकेटच्या सट्ट्यातील अनेक लुझर्सची पावले आत्मघाताकडे वळत असल्याचे या घटनांवरुन दिसून येते.

बिग विनचा मोह

बिग विन च्या अनावर मोहापायी जुगारी वाटेल त्या मार्गाने पैसे उभारण्याचा प्रयत्न करतात. कोणत्याही जुगाराचा शेवट हा वाईटच असतो. काही घरदार सोडून पळून जातात. काहींना तुरुंगात जावग लागते तर काही शेवटी आत्महत्या करतात आणि कुटुंबाला कर्जाच्या खाईत ढकलून देतात.

लुझर्सनी टोकाची पाऊले उचलू नये

कुठलाही सट्टा अथवा जुगार हा वाईटच असतो. सुरुवातीला यात जिंकल्यामुळे बरे वाटत असले तरी याचा शेवट मात्र हा वाईटच असतो. आपल्या आई-वडीलांनी मोठ्या कष्ठाने आपल्या शिक्षणासाठी पैशाची तडजोड केलेली असते. आपली स्वप्न आणि यश हेच त्यांच्या जगण्याचा आधार असतो. सट्टा खेळण्याचे पाऊल उचलून आई-वडीलांच्या स्वप्नांना आणि आत्मविश्वासाला तडा जाऊ देऊ नका, सट्ट्यापासून दूर रहा. आपले लक्ष केवळ अभ्यासावर केंद्रीत करा, आई-वडीलांशी मोकळेपणाने संवाद साधा.

शहरात सुरु आहे बिनभोथाट क्रिकेट सट्टा

गोंदिया शहरात सुद्धा बिनभोभाटपणे क्रिकेट सट्टा खेळला जात आहे. पोलीस विभागाने काही कारवाया सुद्धा केल्या जात आहे. पण यानंतरही पूर्णपणे पायबंद लागलेला नाही. सध्या आयपीएल क्रिकेटमुळे सट्टा बाजार जोरात सुरु असून यासाठी १५ ते १७ वयोगटातील अल्पवयीन मुलांना बुकींकडून टार्गेट केले जात आहे. विशेष म्हणजे शहरातील काही भागात यासाठी आठ ते दहा अल्पवयीन बुकी काम करीत असून त्यांच्यावर शहरातील मोठ्या बुकींचा वरदहस्त आहे.

पालकांनो मुलांचे बँक खाते तपासत राहा

गोंदिया शहरतील काही अल्पवयीन मुले सट्ट्याच्या आहारी गेले असल्याचे पुढे आले आहे. विशेष म्हणजे काही मुलांच्या बँक खात्यावर सट्ट्यातून जिंकलेले लाखो रुपयनचे ट्राझेक्शन सुद्धा झाले आहे. यातील काही मुले ही प्रतिष्ठित कुटुंबातील सुद्धा आहे. तर काही मुले बाहेरगावी शिक्षणासाठी गेली असून ते तिथून सट्टा लावत असल्याची बाब एका बुकीने सांगितले. त्यामुळे या सर्व प्रकारापासून पालकांनी वेळीच सावध होत आपल्या मुलांचे बँक खाते तपासत राहावे.

गोंदियाकरांना वाघोबाचे दर्शन

गोंदिया: गोंदिया शहरापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या चुटीया, रापेवाडा, पिंडकेपार, कारंजा आदी परिसरात शुक्रवार २६ आणि शनिवारी २७ मे रोजी वाघ दिसून आल्याने या परिसरात नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. दरम्यान, वाघावर नजर ठेवण्यासाठी वन विभागही अलर्ट मोडवर आहे. मात्र, दुसरीकडे सोशल मीडियावर वाघाचा एक व्हिडीओ सद्या चांगलाच व्हायरल झाला असून सदर वाघ नुकत्याच सोडण्यात आलेल्या जोडप्यातील असल्याचे बोलले जात आहे. दरम्यान, वन विभागाकडून वाघ असल्याच्या गोष्टीला दुजोरा दिला असला तरी सोशल मीडियावरील त्या व्हिडीओला फेक असल्याचे सांगण्यात आले आहे. तर नागरिकांनी अफवांवर विश्वास न करता सावध राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

गोंदिया जिल्हा वनाने व्यापलेला असून जिल्ह्यात नवेगाव, नागझिरा अभयारण्य आहे. तर नागझिरा उभयारण्याचे बफर झोन क्षेत्र गोरेगाव, गोंदिया परिसरापासून थोड्या अंतरावर पसरलेले आहे. या परिसरात वाघ, बिबट्यासारखे वन्यप्राणी नेहमीच वावरताना दिसतात. जंगल परिसर लागून असल्याने अनेक वन्यप्राणी पाण्याच्या शोधात शहराकडे धाव घेत असतात ही काही नवीन गोष्ट नाही. मात्र शुक्रवार २६ व शनिवार २७ मे रोजी शहरालगतच्या चुटिया, डव्वा, रापेवाडा परिसरात वाघाचे दर्शन होत असल्याचे काही नागरिकांचे म्हणने आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वनविभागानेही या वाघिणीवर नजर ठेवली आहे. मात्र दरम्यान, सोशल मीडियावर व्हायरल झालेला हा व्हिडिओ या भागातील नसल्याचे वनविभागाकडून सांगण्यात येत आहे. तर नागरिकांनी कोणत्याही अफवांना बळू पडू नये, असे आवाहन वन विभागातर्फे करण्यात आले आहे.

संभ्रम कायम

काही महिन्यापुर्वी गोंदिया-कोहमारा राज्यमहामार्गावर एका वाघिणीसह तिचे तीन छावे रस्ता ओलांडत असतानाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. त्यावेळी सदर ठिकाण गोंदिया कोहमारा मार्गावरील मुरदोली जंगल परिसरातील असल्याचे सांगण्यात आले होते. मात्र तो व्हिडीओही फेक असून इतर ठिकाणचा असल्याचे बोलले जात आहे.

व्हिडिओ बनावट आहे

सोशल मीडियावर जो व्हिडिओ व्हायरल झाला आहे. त्यात सदर व्हिडिओ या परिसराचा असल्याचे सांगण्यात येत आहे. दरम्यान सदर व्हिडिओची पडताळणी करण्यात आली असून तो या भागातील नाही तर तो पूर्णपणे खोटा व बनावट व्हिडिओ आहे.

एस.अवगान, राऊंड ऑफीसर, नागझिरा अभयारण्य, गोंदिया

गोठणगाव जिल्हा परिषद क्षेत्रात विविध विकास कामांचे भुमिपुजन

अर्जुनी मोरगाव:- तालुक्यातील गोठणगाव जिल्हा परिषद क्षेत्रातील विविध विकास कामांचे भुमिपुजन जिल्हा परिषद उपाध्यक्ष तथा सभापती शिक्षण क्रीडा व आरोग्य इंजि यशवंत गणविर यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.

गोठणगाव जिल्हा परिषद क्षेत्रातील जब्बारखेडा येथे ११.८२ लक्ष रु.किंमतीच्या नविन वर्गखोली बांधकामाचे व मौजा रांजीटोला येथे जलजीवन मिशन अंतर्गत १४.८१ लक्ष रु.च्या कामाचे भूमिपूजन संपन्न झाले.

सदर भुमिपुजन सोहळ्याला जब्बारखेडा येथे सरपंचा छायाताई अमले, उपसरपंच जागेश्वर मते, माजी जि.प.सदस्य रतिराम राणे, सरपंच संघटनेचे उपाध्यक्ष संजय ईश्वार, अंगणवाडी सेविका निर्मला कोडापे, मदतनीस मिराबाई वलके, माजी सरपंच संजय खरवडे, ग्राम पंचायत सदस्य कविता कोरेटी, विरेखा वलके, सिताराम वलके, दिलिप ताराम, यशवंत तारा, पंढरी पुडो तर रांजीटोला येथे सरपंच बळीराम टेंभुर्णे, उपसरपंच हरीचंद घरत, निखिल कोडवते, शरद शहारे, लक्ष्मी चाचेरे, ममता दोनाडकर, मंगला शेंदरे, यमुना मडावी, बाळकृष्ण ईस्कापे, राजु चाचेरे, तुलाराम बावणे, तानाजी मसराम, मनोज राउत, भारत राउत,कचरु मेश्राम, काशीनाथ मेश्राम, तेजराम सराटे, सुनिल मेश्राम, रविंद्र वाढई, बळीराम मोहनकर, गिरधारी मोहनकर, दयाराम पुसामी तथा गावकरी उपस्थित होते.

विज्ञान शाखेतून प्रतीक्षा गोरेगाव तालुक्यात प्रथम

गोरेगाव: स्थानिक मॉडेल कॉन्व्हेंट ॲन्ड सायन्स कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सायन्स शाखेची यशाची परंपरा कायम ठेवत यावर्षीसुद्धा १०० टक्के निकाल देऊन शाळेला गौरवान्वित केला आहे. यामध्ये प्रतीक्षा उमराव बोपचे हिने ८३.३३ टक्के गुण घेत तालुक्यातून प्रथम आली आहे.

अंजली जगदीश बोचपे हिने ८१.३३ टक्के घेत शाळेतून दुसरी तर अपूर्वा माधोराव आदमने हिने तृतीय क्रमांक पटकावला.

शाळेचे संस्थापक प्रा. आर.डी.कटरे, प्रशासकीय अधिकारी सी.बी.पटले, प्राचार्य सी.पी. मेश्राम, पर्यवेक्षक एस.डी. चिचामे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन सत्कार करुन अभिनंदन करण्यात आले.

एक्यूट पब्लिक शाळेत गुणवंतांचा सत्कार

गोंदिया:- महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण द्वारा फरवरी/मार्च २०२३ मध्ये घेतलेल्या वर्ग १२वी (HSC) च्या परीक्षेत एक्यूट पब्लिक स्कूल गोंदिया मधिल गुणवंत विद्यार्थी व पालकांचा सत्कार स्कूलतर्फे २६मे रोजी पार पडला. यामध्ये वाणिज्य शाखा व विज्ञान शखेचा निकाल १००% लागला. वाणिज्य शाखेतिल प्रज्वल लिल्हारे (९१.१७%), हार्दिक पाचे (८९.८३%) यांशू धुर्वे (८०.८३%) गुणाने पास झालेत.विज्ञान शाखेतिल हरीश पगरवार (८५.१७%), धनश्री पारधी (८३%), श्रद्धा चंद्रवंशी (८२.८३%) व दिव्या ऊमारकर (८२.८३%) गुण प्राप्त करून प्रविष्य श्रेणीत उत्तीर्ण झाले.

सर्व गुणवंतांचा व पलकांचे सत्कार व अभिनंदन कार्यक्रमाकरिता संस्थापक संजय भास्कर, सहसचिव शुभा शाहारे, प्राचार्य शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. सर्व विद्यार्थीयांचे पुष्पगुच्छ व मिठाई देऊन सत्कार करण्यात आले. या प्रसंगी संजय भास्कर व शुभा शाहारे यांनी विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्व विकासाकरिता मार्गदर्शन केले. सर्व विद्यार्थ्यांना उज्वल भविष्या करिता शुभेच्छा देण्यात आले.कार्यक्रमाचे संचालन कु.सानिया यांनी केले व आभार प्रदर्शन एकता पटले यांनी मानले.

रोजगार मेळाव्यात ७० तरुणांची गार्ड पदावर निवड

गोंदिया: जिल्हा पोलीस दलातर्फे अतिदुर्गम नक्षलग्रस्त भागातील सुशिक्षीत बेरोजगार युवकांकरिता पोलीस दादालोरा खिडकी योजनेच्या माध्यमातून पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, अपर पोलीस अधीक्षक अशोक बनकर यांच्या मार्गदर्शनात जिल्हा पोलीस दल आणि जीएसएफ (स्किल इंडिया) रिक्रुटमेंट ऑफिसर ग्रेडिएंट्स ट्रेनिंग ॲकडमी (हैदराबाद) यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील सालेकसा, देवरी, चिचगड, नवेगावबांध, केशोरी, डुग्गीपार या ६ नक्षलग्रस्त पोलीस ठाण्याच्या स्तरावर २२ ते २७ मे दरम्यान सुरक्षा गार्ड रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यात ७० तरुणांची गार्ड पदावर निवड करण्यात आली.

अतिदुर्गम नक्षलग्रस्त भागातील सुशिक्षीत बेरोजगार युवकांकरिता रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी व त्यांना नक्षल चळवळीपासून दूर ठेवून त्यांच्या मनात नक्षल विरोधी जनमत तयार व्हावे. नक्षल विचारसरणीकडे बेरोजगार युवक आकर्षित होणार नाहीत आणि पोलीस व जनता यांचे संबंध दृढ होऊन बेरोजगार युवकांना रोजगाराची कायमस्वरूपी संधी उपलब्ध व्हावी, याकरिता पोलीस दादालोरा खिडकी योजनेच्या माध्यमातून सुरक्षा कार्याकरिता सुरक्षा गार्ड रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यात अतिदुर्गम नक्षलग्रस्त परिसरातील २५० युवकांनी सहभाग नोंदविला होता. रोजगार मेळाव्यात सहभागी युवकांची शारीरिक चाचणी घेण्यात आली. त्यापैकी ७० युवकांची निवड करण्यात आली. त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.

उपविभागीय पोलीस अधिकारी देवरी व आमगाव यांच्या मार्गदर्शनात पोलीस दादालोरा खिडकी योजनेंतर्गत नक्षल सेल गोंदिया, पोलीस ठाणे देवरी, चिचगड, केशोरी, नवेगावबांध, डुग्गीपार, सालेकसा ठाणेदार यांच्या नेतृत्वात पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

हैदराबाद येथे देणार प्रशिक्षण

या रोजगार मेळाव्यात निवड करण्यात आलेल्या ७० युवकांना रिक्रुटमेंट ऑफिसर ग्रेडिएंट्स ट्रेनिंग ॲकडमी हैदराबाद येथे सुरक्षा गार्डच्या ट्रेनिंगकरिता पाठविण्यात येणार आहे. या युवकांचे सुरक्षा गार्डचे प्रशिक्षण पूर्ण होताच त्यांना भारतातील विविध कंपन्यांमध्ये स्थायी स्वरूपाची सुरक्षा गार्डची नोकरी देण्यात येणार आहे.

ग्रामपंचायत तिडका/करड.
पंचायत समिती अर्जुनी/मोरगाव.जिल्हा परिषद गोंदिया.

निविदा सुचना

निविदा क्र.१ जा.क्र.१३ ग्रा.पं.तिडका करड. दिनांक २९/०५/२०२३

ग्रामपंचायत **तिडका करड.** पंचायत समिती **अर्जुनी/मोर.** जिल्हा परिषद गोंदिया. येथे १५ वा वित्त आयोग अंतर्गत व तांडा वस्ती योजना अंतर्गत विवरणातील कामाच्या बांधकामाची ई-निविदा महाराष्ट्र बांधकाम विभागाकडे यथायोग्यश्रेणीत पंजीबद्ध असलेल्या कंत्राटदाराकडून शेकडावार ऑफलाईन पद्धतीने मागवत आहेत.

अ.क्र.	कामाचे नाव	कामाची अंदाजपत्रकीय रक्कम	निविदा फार्मची किंमत	अनामत रक्कम	काम पूर्ण करण्याचा कालावधी
१	१५ वा वित्त आयोग निधी अंतर्गत सिमेंट कॉक्रेट नाली बांधकाम करणे.	५०००००	५००	५०००	६ महिणे
२	तांडा वस्ती योजना अंतर्गत सिमेंट क्रॉक्रेट रोड बांधकाम करणे.	५०००००	५००	५०००	६ महिणे

१) वरील कामाचे निविदा फार्म दिनांक २९/०५/२०२३ पासून ते दिनांक ०८/०६/२०२३ ला सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालय तिडका/करड. येथे कार्यालयीन वेळेत निविदा फार्म विक्री करण्यात येईल व निविदा फार्म विक्री केल्या नंतर पावती मिळेल. २) सदर कामाच्या निविदा मोहरबंद लिफाफ्यात आवश्यक त्या कागदपत्रासह दिनांक २९/०५/२०२३ दिनांक ०८/०६/२०२३ ला सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालय तिरडा/करड. येथे स्विकारण्यात येईल तसेच अनामत रक्कम भरल्याची पावती मिळेल. ३) मोहरबंद निविदा शक्य झाल्यास ग्रामपंचायत तिरडा/करड. येथे मासीक सभेत उघडण्यात येईल. ४) सदर कामाची तपशिलवार संपूर्ण माहिती अटी शर्तीसह ग्रामपंचायतच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध केलेली आहे. ५) प्रत्येक कामासाठी स्वतंत्र निविदा सादर करावी लागेल.

ग्रामसेवक ग्रामपंचायत तिरडा/करड. — **सरपंच** ग्रामपंचायत तिडका/करड.

ग्रामपंचायत बोळदे/करड.
पंचायत समिती अर्जुनी/मोरगाव.जिल्हा परिषद गोंदिया.

निविदा सुचना

निविदा क्र.१ जा.क्र.------ग्रा.पं.बोळदे करड. दिनांक २९/०५/२०२३

ग्रामपंचायत **बोळदे करड.** पंचायत समिती **अर्जुनी/मोर.** जिल्हा परिषद गोंदिया. येथे तांडा वस्ती योजना अंतर्गत विवरणातील कामाच्या बांधकामाची ई-निविदा महाराष्ट्र बांधकाम विभागाकडे यथायोग्यश्रेणीत पंजीबद्ध असलेल्या कंत्राटदाराकडून शेकडावार ऑफलाईन पद्धतीने मागवत आहेत.

अ.क्र.	कामाचे नाव	कामाची अंदाजपत्रकीय रक्कम	निविदा फार्मची किंमत	अनामत रक्कम	काम पूर्ण करण्याचा कालावधी
१	तांडा वस्ती योजना अंतर्गत सिमेंट कॉक्रेट रोड बांधकाम करणे.	५०००००	५००	५०००	६ महिणे

१) वरील कामाचे निविदा फार्म दिनांक २९/०५/२०२३ पासून ते दिनांक ०८/०६/२०२३ ला सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालय बोळदे/करड. येथे कार्यालयीन वेळेत निविदा फार्म विक्री करण्यात येईल व निविदा फार्म विक्री केल्या नंतर पावती मिळेल. २) सदर कामाच्या निविदा मोहरबंद लिफाफ्यात आवश्यक त्या कागदपत्रासह दिनांक २९/०५/२०२३ दिनांक ०८/०६/२०२३ ला सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालय बोळदे/करड. येथे स्विकारण्यात येईल तसेच अनामत रक्कम भरल्याची पावती मिळेल. ३) मोहरबंद निविदा शक्य झाल्यास ग्रामपंचायत बोळदे/करड. येथे मासीक सभेत उघडण्यात येईल. ४) सदर कामाची तपशिलवार संपूर्ण माहिती अटी शर्तीसह ग्रामपंचायतच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध केलेली आहे. ५) प्रत्येक कामासाठी स्वतंत्र निविदा सादर करावी लागेल.

ग्रामसेवक ग्रामपंचायत बोळदे/करड. — **सरपंच** ग्रामपंचायत बोळदे/करड.

ग्रामपंचायत हिरापूर
पंचायत समिती, गोरेगाव जिल्हा परिषद,गोंदिया

निविदा क्रमांक-०२/२०२३ दिनांक-२५/०५/२०२३

ग्रामपंचायत हिरापूर येथील १५ वा वित्त आयोग निधी अंतर्गत विविध साहित्य खरेदी करिता खालीलप्रमाणे लिफाफाबंद पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहे.

अ.क्र.	कामाचे नाव	वस्तु/साहित्याचे नाव
१	ग्रामपंचायत व परिसरात आयपी (Internet Protocol) कॅमेरे लावणे	बुलेट कॅमेरा,डोम कॅमेरा,नेटवर्क व्हिडीओ रेकॉर्डर,हार्ड डिस्क,पॉवर सप्लाय,लैन केबल LED ३२ इंच २ टीबी हार्ड,ड्राईव्ह व संपूर्ण फिटींगसह
२	अंगणवाडी करिता साहित्य खरेदी करणे, खुर्च्या,चप्पल स्टँड, टेबल, गॅस	बॅग,खुर्च्या,चप्पल स्टँड, टेबल, गॅस (प्रती नग)
३	ग्रामपंचायत करिता सहित्य खरेदी करणे	पंखे, कुलर व कपाट (प्रती नग)

निविदा काढण्याची तारीख २६/०५/२०२३ निविदा स्विकारण्याची शेवटची तारीख ०२/०६/२०२३ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत निविदा उघडण्याची तारीख ०४/०६/२०२३ शक्य झाल्यास (ग्रामपंचायत मासिक सभेत) वरिल निविदेच्या शर्ती व अटी ग्रामपंचायत कार्यालय हिरापूर येथील नोटीस बोर्डावर उपलब्ध आहे.

सरपंच ग्रामपंचायत हिरापुर — **ग्रामसेवक** ग्रामपंचायत हिरापुर

ग्रामपंचायत कार्यालय झाशीनगर
पंचायत समिती, अर्जुनी/मोर जि.प.गोंदिया

निविदा क्रमांक-०१

ग्रामपंचायत झाशीनगर अंतर्गत विवरणातील बांधकामाची निविदा महाराष्ट्र बांधकाम विभागाकडे यथायोग्य श्रेणीत पंजीबद्ध असलेल्या कंत्राटदाराकडून शेकडावारी ऑफलाईन पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहेत.

कामाचे विवरण

अ.क्र.	योजनेचे कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम	अनामत रक्कम	काम करण्याचा कालावधी	कोरी निविदा किंमत
१	जि.प.शाळा झाशीनगर येथे नवीन वर्गखोली बांधकाम करणे योजनेचे नाव:- जिल्हा व वार्षिक योजना सन-२०२२-२३/ शिक्षण प्रा.शा.इ.बां.जि.प. अनुदान २२०३J १८१	११६७८३६/-	११,५६७	६ महिने	१०००

(विस्तृत अंदाजपत्रक ग्रामपंचायतीच्या नोटीस बोर्डावर बघायला मिळेल) निविदा पद्धतीचा तपशील:- वरील निविदा प्रक्रिया दिनांक ३१/०५/२०२३ ला सकाळी १०.०० वाजेपासून ते ६/०६/२०२३ ला सायंकाळी ५.४५ वाजेपर्यंत (सुट्टीचा दिवस वगळून) या कालावधीत राबवण्यात येईल. सदर निविदा ही पुढच्या मासिक सभेत उघडण्यात येईल.
सदर निविदेची तपशिलवार संपूर्ण माहिती अटी व शर्तीसह ग्रा.पं.च्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध केलेली आहे.

सरपंच ग्रामपंचायत झाशीनगर — **ग्रामसेवक** ग्रामपंचायत झाशीनगर

कार्यालय ग्राम पंचायत बाराभाटी
पंचायत समिती अर्जुनी/मोर जिल्हा परिषद गोंदिया

निविदा सुचना
(पहिली वेळ)

सर्व इच्छूक साहित्य पुरवठा धारकास व कंत्राटदाराना सुचित करण्यात येत आहे कि ग्राम पंचायत बाराभाटी ला खालील विवरण पत्राप्रमाणे साहित्याची आवश्यकता असल्याचे इच्छूक पुरवठा धारकाकडून दिनांक ०६/०६/२०२३ ला दुपारी ३.०० वाजे पर्यंत लिफाफा पद्धतीने निविदा दरपत्रक मागविण्यात येत आहे निविदा फार्म प्रक्रिया दिनांक ३१/०५/२०२३ ते ०६/०६/२०२३ पर्यंत कार्यालयीन वेळेत राहील. निविदा बाबतचे अटी व शर्ती संबंधित ग्राम पंचायत कार्यालयात कार्यालयीन दिवशी व वेळेत पहावयास मिळेल. सदर निविदा दिनांक ३१/०५/२०२३ ते ०६/०६/२०२३ दुपारी ३.०० वाजे पर्यंतचे कालावधीत कार्यालयीन वेळेत स्विकारण्यात येतील.

अनु.क्र.	कामाचे नाव	कामाची अंदाजपत्रकीय रक्कम	निविदा फार्म ची किंमत	अनामत रक्कम (१%)	काम पूर्ण करण्याचा कालावधी
१	अंगणवाडी करीता शौचालय बांधकाम करणे	१२००००/-	५००/-	१२००/-	३ महिने
२	बंधिस्त नाली बांधकाम करणे	२६००००/-	५००/-	२६००/-	३ महिने
३	हनुमान मंदिरचे बाजूच्या परिसरात पेव्हर ब्लॉक बसविणे	१५००००/-	५००/-	१५००/-	३ महिने
४	जिल्हा परिषद शाळेच्या पटांगणात पेव्हर ब्लॉक बसविणे	१००००००/-	५००/-	१०००/-	३ महिने
५	बौद्ध विहाराचे बाजूच्या परिसरात पेव्हर ब्लॉक बसविणे	२६००००/-	५००/-	२६००/-	३ महिने
६	ग्राम पंचायत आवाराचे गेट व आवार भिंत बांधकाम करणे	२५००००/-	५००/-	२५००/-	३ महिने
७	कार्यालयीन स्टेशनरी खरेदी करणे				१२ महिने
८	ब्लिचिंग पावडर खरेदी करणे				१२ महिने
९	एल.ई.डी.बल्ब खरेदी करणे				१२ महिने

१) वरील कामाचे निविदा फॉर्म दिनांक ३१/०५/२०२३ ला सकाळी ११.०० वाजे पासून ते दि.०६/०६/२०२३ ला दुपारी ३.०० वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) या कालावधीत ग्राम पंचायत कार्यालय बाराभाटी येथे कार्यालयीन वेळेत निविदा फॉर्म विक्री करण्यात येईल व निविदा फॉर्म विक्री केल्यानंतर पावती मिळेल. २) सदर निविदा मोहरबंद लिफाफ्यात आवश्यक त्या कागद पत्रासह दिनांक ३१/०५/२०२३ ला सकाळी ११.०० वाजे पासून ते दि.०६/०६/२०२३ ला दुपारी ३.०० वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) या कालावधीत ग्राम पंचायत कार्यालयात स्विकारण्यात येईल. तसेच अनामत रक्कम भरल्याची पावती मिळेल. ३) मोहरबंद निविदा लगतच्या मासिक सभेत ग्राम पंचायत बाराभाटी येथे उघडण्यात येईल. ४) सदर कामाचा तपशीलवार संपूर्ण माहिती अटी शर्तीसह ग्राम पंचायतच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध केले आहे.

सरपंच ग्राम पंचायत बाराभाटी — **ग्रामसेवक** ग्राम पंचायत बाराभाटी

मुरकुटडोह दंडारीची शाळा तीन वर्षांपासून बंद

गोंदिया:- जिल्ह्याच्या शेवटच्या टोकावर बसलेल्या अतीदुर्गम नक्षलग्रस्त भाग म्हणून ओळखले जाणारे मुरकुटडोह दंडारी येथील शाळा बंद पडल्याने गावातील विद्यार्थ्यांना तालुकास्थळावरील खासगी व शासकीय आश्रमशाळेत पाठविण्याची वेळ पालकांवर आली आहे.

ये-जा करायला साधन नसतानाही त्याठिकाणी सर्व शिक्षा अभियानाच्या माध्यमातून शाळेची इमारत उभारली गेली.सुरवातीला त्या शाळेत विद्यार्थ्यांना शिक्षकाकंडून अभ्यासाचे धडेही मिळाले.मात्र काही दिवसानीच त्या शाळेत शिकवायला नियुक्त शिक्षकही नक्षल्यांच्या भितीने माघार घेऊ लागल्याने तेथील विद्यार्थ्यांना शिक्षणाची दारे हळूहळू बंद होऊ लागली. त्यानंतर पालकांनीही आपल्या मुलांना शिक्षकच येत नसल्याचे बघत दरेकसा, सालेकसा व पिपरीया येथील आश्रमशाळामध्ये मुलांना पाठवायला सुरवात केली.त्यानंतर कमी पटसंख्येचे कारण करुन त्या शाळा बंद करण्याचा निर्णय तत्कालीन शिक्षणाधिकारी यांनी घेतल्याचे समोर आले आहे.तेव्हापासून या शाळा म्हणजे ३-४ वर्षांपासून बंद पडल्या आहेत.

मागील तीन वर्षांपासून शाळा बंद असल्याने गावातील मुले शासकीय व खासगी आश्रम शाळेत निवासी आहेत. जिल्हा परिषद शाळेच्या इमारती असल्या तरी ओसाड आहेत. मुरकुटडोह क्र.१ येथील शाळेची दुरावस्था झाली आहे तर मुरकुटडोह क्र.२ मध्ये तर कंत्राटदाराने साहित्य ठेवले आहेत. दंडारीची शाळेची इमारत बंद आहे. आधी शिक्षक जात नसल्याने मुलांनी आश्रम शाळेची वाट धरली.

माओवाद्याच्या भीतीने या ठिकाणी शिक्षकच शाळेत जायला घाबरत आहेत. सध्याची परिस्थिती ही आधीपेक्षाही चांगली असून ये जा करण्यासाठी चांगला रस्ता आणि सुरक्षेकरीता पोलिसांचे बेस कॅम्प त्याठिकाणी असल्याने त्याठिकाणच्या शाळा सुरु झाल्यास आमच्या मुलांना इतरत्र पाठवण्याची गरज पडणार नसल्याचे टेकाटोला निवासी पैकुलाल पंधरे, मुरकुटडोहचे कमल इनवाते आदींनी आपल्या भावना व्यक्त केले. तर किमान एका गावात शाळा सुरू व्हावी म्हणून प्रयत्न करीत असल्याचे झुमक टेकाम यांनी सांगितले. यापुर्वी जिल्हाधिकारी व आमदारही येऊन शाळा सुरु करण्याचे आश्वासन देऊन गेले मात्र आजपर्यंत याठिकाणी शाळा सुरु न होता बंद पडल्याने इमारतीही आपल्यावर अश्रू ढाळत बसल्या आहेत.

शाळा सुरु करण्यासंदर्भात हालचाली सुरु- गटशिक्षणाधिकारी- विशाल डोंगरे

मुरकुटडोह दंडारी येथील शाळा तीनचार वर्षांपासून बंद असून त्या ठिकाणी शिक्षकांची नियुक्तीही सध्या केलेली नाही. कमी पटसंख्येच्या कारणावरुन त्या शाळा त्यावेळी बंद करण्यात आल्या होत्या. मात्र सध्या पालकांची मागणी येत असल्याने त्याठिकाणी पालकांचे हमीपत्र घेऊन शाळा सुरु करण्यासंदर्भात हालचाली सुरु करण्यात आलेल्या आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदार पुत्राच्या नेतृत्वात २ नगराध्यक्षांसह १५ नगरसेवक शिंदे गटात

गोंदिया : जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात आज मोठे खिंडार पडले असून अर्जुनी मोरगाव विधानसभा क्षेत्राचे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार मनोहर चांद्रिकपुरे यांचे सुपुत्र सुगत मनोहर चांद्रिकापुरे यांच्या नेतृत्वात गोंदिया जिल्ह्यातील सडक अर्जुनी व अर्जुनी मोरगाव नगर पंचायतचे राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही नगराध्यक्ष आणि १५ नगरसेवकांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाणे निवासस्थानी शिवसेनेत प्रवेश केला.

या प्रसंगी शिवसेना गोंदिया जिल्हा प्रमुख सुरेंद्र नायडू उपस्थित होते. या प्रवेशामुळे गोंदिया-भंडारा जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेसचे मोठे नेते खा. प्रफुल पटेल आणि माजी आमदार राजेन्द्र जैन यांचा नेतृत्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमधून शिवसेनेत प्रवेश केलेल्यांमध्ये सडक अर्जुनी नगर पंचायतचे नगराध्यक्ष तेजराम मडावी, उपाध्यक्ष वंदना किशोर डोंरगरवार, बांधकाम सभापती अंकित टिकाराम भैंडारकर, माजी बांधकाम सभापती महेंद्र जयपाल वंजारी, पाणी पुरवठा सभापती साईस्ता मतीन शेख, महिला बाल कल्याण सभापती दीक्षा राजकुमार भगत, माजी नगरअध्यक्ष देवचंद तरोने, माजी नगर अध्यक्ष शशीकला टेंभुर्णे, नगर सेवक गोपीचंद धोंडू खेडकर, नगर सेवक अशलेस मनोहर अंबादे, नगर सेवक तायमा जुबेर शेख, नगर सेवक कामिनी कोवे, दिलीप गभने माजी नगसेवक, धानवंत कोवे, विदेश टेंभुर्ने, मतीन शेख, मोरगाव नगर पंचायतचे नगराध्यक्ष मंजुषा बारसागडे, बांधकाम सभापती सागर आरेकर व नगरसेवक दीक्षा शहारे आणि इतर दोन नगरसेवकांचा समावेश आहे.

प्राध्यापकाने यूजीसीला सादर केले नेटचे बोगस प्रमाणपत्र, देवरी पोलिसांनी नोंदवला गुन्हा

गोंदिया : देवरी तालुक्यातील सुरतोली येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात तात्पुरते म्हणून रुजू झालेल्या प्राध्यापकाने संस्था सचिवाच्या व जुन्या प्राचार्यांच्या बोगस स्वाक्षऱ्या करून आपले प्राध्यापकपद कायम करण्यासाठी नेट झाल्याचे बोगस प्रमाणपत्र यूजीसीला सादर केल्याप्रकरणी त्या प्राध्यापकासह त्याला मदत करणाऱ्या दुसऱ्यावरही देवरी पोलिसांत फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सुरतोली लोहारा येथील सचिव राजकुमार केवळराम मडामे (४८) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार सन २०१२ मध्ये आरोपी तथागत प्रल्हाद गजभिये (३३) याची लिपिक म्हणून नियुक्ती तात्पुरत्या स्वरूपात केली.त्यानंतर सन २०१६ मध्ये आरोपी राहुल तागडे याची मराठीचे प्राध्यापक म्हणून तात्पुरती स्वरूपाची नियुक्ती केली होती; परंतु या दोन्ही आरोपींनी संस्था सचिवाला माहीत न करता खोटे कागदपत्र तयार करून स्वतःला पूर्णकालीन प्राध्यापक दाखविले.

कोरोना काळात संस्था सचिव राजकुमार मडामे हे महाविद्यालयात गेल्यावर त्यांच्या निदर्शनास हा प्रकार आला.आरोपींनी संस्था सचिवाच्या खोट्या सह्या करून प्रस्ताव विद्यापीठाला पाठविला.खोट्या सह्यांच्या आधारे स्वतःची नियुक्ती करून घेतली.आरोपीने नेटचेही प्रमाणपत्र बोगस जोडून विद्यापीठाच्या ग्रँड कमिशन यूजीसी दिल्लीकडे पाठविले.बनावट कागदपत्र पाठवून दिशाभूल करणाऱ्या तथागत प्रल्हाद गजभिये व राहुल तागडे या दोघांवर देवरी पोलिसांनी भादंविच्या कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. तपास सहायक पोलिस निरीक्षक घाडगे करीत आहेत

आत्मसमर्पित राजूलाची १२ वीच्या परिक्षेत यशस्वी भरारी

गोंदिया:- नक्षलवाद्यांनी २०१७ मध्ये (KKD दलम, पक्ष सदस्य म्हणून)जबरीने नक्षल चळवळीत ओढलेल्या आत्मसमर्पित नक्षल कु. राजुला(अनिता) रवेलसिंग हिडामी, वय २१ वर्षे राहणार-लवारी, पोस्ट-पुराडा,ता.कुरखेडा,जि.गडचिरोली हिने नुकत्याच जाहीर झालेल्या इयत्ता १२ वी च्या परीक्षेत ४६% गुण मिळवून उत्तीर्ण झाल्याने पोलीस अधिक्षक निखील पिंगळे व त्यांच्या सहचारिणी समृध्दी पिंगळे यांच्या हस्ते राजुलाचा सत्कार करण्यात आला.

राजुलाला नक्षलवाद्यांनी जबरीने नक्षल चळवळीत जुलै २०१७ (KKD दलम, पक्ष सदस्य म्हणून), सहभागी करून घेतले होते. परंतू नक्षलवाद्यांबरोबर राहून जिवन जगत असतांना तिला येणाऱ्या अडचणीमुळे ती कंटाळली होती. तीला नक्षल (संघटनेत) चळवळीत स्वारस्य नव्हते. त्यामुळे तिने गोंदिया जिल्हा पोलिसांसमोर २४ ऑगस्ट २०१८ रोजी आत्मसमर्पण केले होते.

आत्मसमर्पणानंतर पोलीस दलातर्फे तत्कालीन पोलीस अधीक्षक हरिष बैजल, अप्पर पोलीस अधीक्षक श्री. आटोळे यांचे प्रयत्नाने कु. राजुलाचे पुनर्वसन करण्यात येऊन शासनाच्या आत्म समर्पण योजनेच्या माध्यमातून ती अगोदरची ७ वी पास असल्याने व तिला पुढे शिकण्याची इच्छा व आवड असल्याने सन २०१८ मध्ये देवरी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत ८ वी मध्ये प्रवेश देण्यात आला होता. पुढे गोंदिया जिल्हा पोलीस दलाचे सहकार्याने नियमित शिक्षण घेत जून २०२१ मध्ये तिने १० वीची परीक्षा ५१.८०% गुण मिळवून उत्तीर्ण केली. त्याचप्रमाणे मनोहरभाई पटेल ज्यु. कॉलेज देवरी येथे शिक्षणं घेत असताना तिने २०२३ मध्ये १२ वी ची परीक्षा देत तिने ४६% गुण मिळवून उत्तीर्ण केली आहे.

कुमारी राजुला हिने माओवादी विचारसरणीला डावलून, हिंसाचाराचा मार्ग सोडून आत्मसमर्पण केल्यानंतर अथक परिश्रम घेवून १० वी, १२ वी चे शिक्षणं पुर्ण करीत घेतलेली यशस्वी भरारी कौतुकास्पद असल्याने तिचा सन्मान म्हणुन दिनांक २७ मे रोजी पोलीस अधीक्षक कार्यालयात पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे व श्रीमती समृद्धी पिंगळे यांचे हस्ते सत्कार करुन पुढील वाटचालीसाठी तिला शुभेच्छा देण्यात आल्या.

सदर प्रसंगी कु. रजुला हिने आपले मनोगत व्यक्त करताना पदवी पर्यंत शिक्षण पूर्ण करुन पोलिस दलात भरती होण्याची इच्छा व्यक्त केली.पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे यांनी तिचे पुढील शिक्षण पूर्ण करण्यासाठी आवश्यक ती सर्व मदत करण्याचे आश्वासन दिले.सदर सत्कार कार्यक्रमाप्रसंगी पोलीस निरीक्षक दिनेश तायडे, श्रीकांत हत्तीमारे , तसेच नक्षल सेल येथील पोलीस अधिकारी व अंमलदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्हाधिकाऱ्यांची कारागृहाला भेट व पाहणी

भंडारा : जिल्हा कारागृहात बंदीवानांना मिळणाऱ्या जेवनाची, निवासाची, बंदीवानांना त्यांच्या कुटुंबासोबत संवाद साधण्यासाठी असणाऱ्या सुविधेची तसेच महिलांसाठी असणाऱ्या विभक्त सेलला आज जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी भेट देऊन पाहणी केली.

कारागृहातील बंदीवांनाची नियमित आरोग्य तपासणी करावी. कारागृहात राष्ट्रीय सण साजरे करावे. कारागृहातील कामकाजात संगणकाचा वापर करण्यात यावा. बंदीवानांसाठी उपलब्ध असलेल्या व्हिडीओ कॉलींग सुविधेवर बारकाईने लक्ष ठेवावे त्याचा गैरवापर होणार नाही, याची दक्षता घ्यावी. अशा सूचना जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी कारागृह प्रशासनास यावेळी दिल्या. जिल्हा कारागृहाचे अधिक्षक देवराव आडे यांनी बंदीवानांना उपलब्ध असणाऱ्या सुविधांची माहिती यावेळी दिली.

उपजिल्हाधिकारी महेश पाटील, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दिपचंद सोयाम, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मिलींद सोनकुवर, जि.प. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण) मनीषा कुरसंगे, कारागृह अधिक्षक देवराव आडे, नगर परिषद मुख्याधिकारी विनोद जाधव, जिल्हा कारागृहाचे अधिकारी श्री. आगाशे यावेळी उपस्थित होते.

सुगत शिंदे गटात गेला तरी मी राष्ट्रवादीतच राहणार: मनोहर चंद्रिकापुरेंची स्पष्टोक्ती

गोंदिया : अर्जुनी मोरगाव विधानसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार मनोहर चंद्रिकापुरे यांचे पुत्र डॉ. सुगत चंद्रिकापुरे यांनी शुक्रवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाणे येथील निवासस्थानी शिवसेनेत प्रवेश केला. यानंतर भंडारा-गोंदिया जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आणि तर्कवितर्कांना उधाण आले. यातच सुगत शिंदे गटात गेला असला तरी मी राष्ट्रवादीतच कायम राहणार, अशी स्पष्टोक्ती आमदार मनोहर चंद्रिकापुरे यांनी दिली आहे.

राष्ट्रवादीचे दिग्गज नेते खा. प्रफुल्ल पटेल यांच्या नेतृत्वाखाली पक्षाने मनोहर चंद्रिकापुरे यांना अर्जुनी मोरगाव मतदारसंघातून तिकीट दिले. चंद्रिकापुरे यांच्या विजयात पटेल यांची मोलाची भूमिका होती. यानंतर पटेल यांनी त्यांच्याकडे मोरगाव मतदारसंघाची मोठी जबाबदारी सोपवली. मात्र, सुगत चंद्रिकापुरे यांनी दोन नगराध्यक्ष आणि काही नगरसेवकांसह शिंदे गटात प्रवेश केल्याने राष्ट्रवादीला मोठे खिंडार पडले. सुगत यांचा शिंदे गटातील प्रवेश प्रफुल्ल पटेल यांच्यासह आ. चंद्रिकापुरे यांच्यासाठी मोठा राजकीय धक्का मानला जात आहे.

सुगत यांनी शिंदे गटात केलेला प्रवेश हे त्यांचे दुर्दैवी पाऊल आहे. मला कुठलीही माहिती न देता आणि माझ्या परवानगीशिवाय त्यांनी हा निर्णय घेतला. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी गोंधळून जाऊ नये. मी खासदार प्रफुल्ल पटेल यांच्या नेतृत्वाखाली पूर्ण निष्ठेने राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये कार्यरत राहीन. पक्षाने आ.अनिल देशमुख आणि माझ्यावर विदर्भातील ६ जिल्ह्यांतील बुथ कमिट्यांची जबाबदारी सोपविली आहे. मला आजपावेतो जो राजकीय मानसन्मान मिळाले तो राष्ट्रवादी काँग्रेस आणि खासदार प्रफुल्ल पटेल यांच्यामुळेच मिळाला, असे आ. चंद्रिकापुरे यांनी स्पष्ट केले आहे.

मांग-गारोडी समाजातील नागरिकांना मिळणार हक्काचा निवारा

गोंदिया :- कुडवा (गोंदिया) येथील अण्णाभाऊ साठेनगर येथे मांग-गारोडी समाज मागील २५ ते ३० वर्षांपासून वास्तव्यास असून हा समाज अशिक्षीत व समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर आहे. त्यांचे अत्यंत हलाखीचे जीवन आहे. विशेष समाज कल्याण विभागाच्या विशेष पुढाकाराने या वस्तीत सुविधांचा जणू मोगरा फुलला आहे. सामाजिक न्याय विभागामार्फत अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांकरीता रमाई आवास योजना राबविण्यात येते. या योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील नक्षलग्रस्त व दुर्गम क्षेत्रातील नागरिकांना घराच्या बांधकामाकरीता १ लाख ३० हजार रुपये टप्प्या-टप्प्याने अनुदान देण्यात येते. सन २०२१-२२ मध्ये रमाई आवास योजनेअंतर्गत मांग-गारोडी समाजातील २५ कुटूंबाचे प्रस्ताव मंजूर करण्यात आले होते.

या २५ कुटूंबांचा रमाई आवास योजनेंतर्गत सामुहिक भूमिपूजन सोहळा २५ मे २०२३ रोजी आयोजित करण्यात आला होता. सदर घरकुलांचे भूमीपूजन समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त विनोद मोहतुरे, सामाजिक कार्यकर्त्या डॉ.सविता बेदरकर, समाज कल्याण विभागाचे संगणक ऑपरेटर लक्ष्मण खेडकर, समाज कल्याण निरीक्षक स्वाती कापसे, कनिष्ठ लिपीक अमेय नाईक, मांग-गारोडी समाजाचे विजय पात्रे, वंदना पात्रे, किशोरकुमार कांबळे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त विनोद मोहतुरे यांनी या समाजाच्या इतर समस्या जसे- काही लोकांना जातीचे प्रमाणपत्र, आधारकार्ड, विधवा महिलांना संजय गांधी निराधार योजनेचा लाभ मिळणे, घरकुल योजनेचा लाभ इत्यादी बाबत त्यांच्या जवळ बसून चर्चा केली. शक्य तितक्या लवकर त्यांच्या समस्या मार्गी लावण्यासाठी विशेष शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे असे आश्वासन विशेष समाज कल्याण विभागाच्या वतीने देण्यात आले.

सदर वस्तीसाठी विशेष समाज कल्याण विभागाच्या वतीने प्रत्येक योजना सामाजिक न्याय विभागाच्या त्यांच्या दारात पोहोचविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा लक्ष्मण खेडकर व तत्कालीन समाज कल्याण सहायक आयुक्त डॉ.मंगेश वानखडे यांचे या वस्तीत व्यक्तीशः लक्ष्य तसेच विद्यमान समाज कल्याण सहायक आयुक्त विनोद मोहतुरे यांच्या प्रयत्नाने ही वस्ती आता समाजाच्या मुख्य प्रवाहात जोडली जात आहे.

गोरेगाव बाजार समिती सभापतीपदी गिरधारी बघेले तर उपसभापतीपदावर तेजेंद्र हरिणखेडेची निवड

गोरेगाव:- गोरेगाव बाजारसमितीवर भाजप काँग्रेस राकाँच्या किसान सहकार पॅनलने एकहाती विजय मिळविले होते. त्यानंतर २९ मे रोजी झालेल्या सभापती व उपसभापती निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचे गिरधारी बघेले यांची सभापती तर भाजपचे तेजेंद्र हरिणखेडे यांची उपसभापती पदावर बिनविरोध निवड झाली.

या निवडणुकीत भाजपप्रणीत किसान सहकार पॅनलने १८ पैकी १६ जागा जिंकल्या होत्या. त्यामध्ये किसान सहकार पॅनलचे ग्रामपंचायत गटातून तेजेंद्र हरिणखेडे, नुमानचंद चौधरी, नरेंद्र रहांगडाले, महिला गटातून शशीताई फुंडे, अडते व्यापारी व हमाल गटातून गोपाल ठाकूर, योगराज पटले, राजेश ताराम, तर कैलास डोंगरे, गिरधारी बघेले, दसाराम साऊसकर (अविरोध), सेवा सहकारी गटातून किशोर गौतम,मोहन ठाकरे, योगराज पारधी, उकराम बिसेन,संजय भगत,संतोष रहांगडाले, अपक्ष महेंद्र ठाकूर तर सहकार परिवर्तन पॅनलच्या डिलेश्वरी तिरेले या महिला गटातून एकमेव विजयी झाल्या. झालेल्या सभापती, उपसभापती निवडणुकीनंतर भाजपच्या वतीने विजयोत्सव साजरा करीत बाजार समिती आपल्या ताब्यात ठेवण्यात यश मिळविले.त्यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.

मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण नको; ओबीसी समाज विचारवंतांच्या बैठकीत विरोध

छत्रपती संभाजीनगर: -मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देऊ नका, अशी मागणी ओबीसी समाज विचारवंतांच्या झालेल्या बैठकीत करण्यात आली. मराठा आणि ओबीसी संघर्ष टाळण्यासाठी सरकारने लवकरात लवकर लक्ष द्यावे, असे आवाहनही यावेळी करण्यात आले.

ओबीसी समाजातील सर्व घटकांना एकत्र आणून त्यांच्या समस्यांसंदर्भात पुढील भूमिका ठरविण्यासाठी या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. छत्रपती संभाजीनगरमधील श्री. संत सेना भवन येथे झालेल्या या बैठकीला ओबीसी समाजातील विचारवंतांची उपस्थिती होती.

सरकारने लक्ष द्यावे

मराठा समाजाच्या खांद्याला खांदा लावून ओबीसी समाजाने मराठा आरक्षणाला स्वतंत्र आरक्षणासाठी पाठिंबा दिला होता. मात्र, आता मराठा समाजातील काही नेते ओबीसी आरक्षणातून मराठा समाजासाठी आरक्षणाची मागणी करत आहेत. शासन स्तरावरही ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का देण्याचे काम सध्या सुरू आहे. मराठा आणि ओबीसी संघर्ष टाळायचे असेल, तर सरकारने वेळीच लक्ष द्यावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

जातीय सलोखा राखा

मराठा आरक्षण हा विषय जातीय सलोख्याने हाताळावा, सामाजिक वातावरण खराब होऊ नये यासाठी मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देऊ नये, अशी मागणी करत मराठा समाजाचे ओबीसीकरण नको अशी भूमिका ओबीसी समाज विचारवंतांच्या बैठकीत घेण्यात आली. दोन सत्रात झालेल्या बैठकीच्या अध्यक्षतेस्थानी प्रा. प्रल्हाद लुलेकर, प्रा. श्रावण देवरे होते.

यावेळी कल्याण दळे, डॉ. राजेंद्र कुंभार, राजीव हाके, प्रा. प्रभाकर गायकवाड, डॉ. साहेबराव पोपळघट, प्रा. वसंत हारकळ, डॉ. संजय मून, स. सो. खंडाळकर, लक्ष्मण वडले, शंकरराव लिंगे, दीपांकर शेंडे, सुभाष दगडे, विष्णू वखरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

अन्यथा रस्त्यावर उतरू

बैठकीच्या सुरुवातीलाच ओबीसी कोट्यातून मराठा समाजाला आरक्षण देण्याच्या मागणीला प्रखर विरोध करण्यात आला. सवीच्च न्यायालयाने मराठा आरक्षण रद्द केल्यानंतर आता ओबीसीमध्ये मराठा समाजाला सामावून घेण्यासाठी विविध नेत्यांकडून मागणी होत आहे. मंडळात मराठा समाजाला आरक्षण द्यायला ओबीसी समाजाचा विरोध नाही. मात्र, त्यासाठी ओबीसींच्या हक्काच्या आरक्षणाला धक्का न लावता सरकारने मराठा समाजाला आरक्षण द्यावे.

कोणत्याही परिस्थितीत ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागता कामा नये, अशी एकमुखी मागणी बैठकीत करण्यात आली. ओबीसी समाजाचा विरोध असतानाही मराठा समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न ओबीसींच्या कोट्यातून सोडविण्याचा विचार जरी सरकारने आणला तर राज्यातील तमाम ओबीसी समाज रस्त्यावर उतरेल, असा इशाराही शासनाला यावेळी देण्यात आला.

राज्यभर जनजागृती

ओबीसी समाजाचे आरक्षण, जातनिहाय जनगणना यासह अन्य प्रश्नांसंदर्भात विचारविनीमय तसेच ओबीसी समाजातील सर्व घटकांना एकत्र आणण्यासाठी ओबीसी समितीच्या वतीने राज्यभर विचारवंतांची बैठक व मेळावे घेण्यावरही यावेळी शिक्कामोर्तब करण्यात आले. त्यात अमरावती, अहमदनगर, गोंदिया, धुळे, कोल्हापूर, मालवण येथे ओबीसी समाजातील विचारवंतांची बैठक तर पुणे, अकोला, नागपूर, सोलापूर या ठिकाणी मेळावे घेण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला.

बैठकीत घेतलेले ठराव

☐महाराष्ट्र विधान सभेने ओबीसीची जातनिहाय जनगणनाबाबत केलेल्या ठरावाची अंमलबजावणी करावी.

☐सर्वच राजकीय पक्षांनी ओबीसी प्रवर्गातील सेल, आघाडी हे शब्द प्रयोग बंद करावेत. विधानसभा, लोकसभा मधील ओबीसींचे आरक्षण द्यावे, सर्व मंदिरामध्ये बहुजन समाजाला संख्येच्या प्रमाणात प्रतिनिधीत्व द्यावे.

☐बहुजन-ओबीसी लोक, दैवतांच्या स्थळांना तीर्थस्थानांचा दर्जा देऊन त्यांचा विकास करावा. शिवाय तेथे बहुजन समाजातील पुजारी नेमण्यात यावे.

☐ओबीसी-बहुजन महापुरुषांचा गड उभा करण्यात यावा, नव्या संसद भवनाला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे.

☐नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० रद्द करून सर्वांना समान शिक्षण अर्थात मोफत शिक्षण देण्यात यावे. हे ठराव सर्वानुमते पारित करण्यात आले.

मुरकुटडोहवासीयांना हेलीकॉप्टरचे दर्शन मात्र लालपरीचे दर्शन कधी होणार

गोंदिया:- सातपुडा आणि मायकल पर्वताच्या त्रिकोणी संगमाच्या मधोमध घनदाट जंगलात वसलेली सालेकसा तालुक्यातील अतिसंवदेनशील आदिवासी वस्ती असलेली दंडारी आणि मुरकुटडोह १,२,व ३ ही गावे.या माओवादग्रस्त भागातील या गावांत जाण्यासाठी आधी रस्ता नसल्याने जगापासून दुरावली होती. मात्र ही गावे मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या डांबरी रस्त्याने जोडली गेली आहेत. त्या गावात आजपर्यंत गेल्या तीन वर्षात दोन-तीनदा हेलिकॉप्टरचे दर्शन झाले,मात्र आम्हाला लालपरीचे अजून दर्शन न झाल्याने दरेकसा व सालेकसा येथे जाण्यासाठी अडचणीचा सामना करावा लागत असल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली.

सालेकसापासून सुमारे ३५ किलोमीटर दूर अंतरावर टेकाटोला, मुरकुडोह १, मुरकुडोह २, मुरकुडोह ३, दंडारी ही पाच गावे आहेत. पाचही गावांत गोंड समाजाचे तीन हजारांवर लोक वास्तव्यास आहेत. पावसाळ्यात धान पिकाची लागवड करून हे आदिवासी आपली उपजिविका चालवितात. नंतर मोलमजुरी करून दिवस काढतात.तीन वर्षाआधी या गावांना जाण्यासाठी रस्ताच नसल्याने पायवाटेने पहाड पार करून दरेकसा गाठत असत.

या गावांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून धनेगाव-टेकाटोला-दलदलकुही-मुरकुटडोह १ पर्यंत १५.५ किमीचा डांबरी रस्ता बांधून तीन वर्ष लोटले.मात्र स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षातही या गावातील नागरिकांना लालपरीचे अद्यापही दर्शन झालेले नाही. जाणार आहे.